# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२१

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

### मुंबईतील झोपड्यांमध्ये पहिल्या मजल्यावर राहणाऱ्या झोपडीधारकास झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत समाविष्ट करण्याबाबत

**(१) १८५ (१६-०३-२०२०). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.महेश बालदी (उरण), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.सुनील राणे (बोरीवली) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमध्ये गत २० ते २५ वर्षे ६० टक्के लोक झोपडपट्टीमध्ये पहिल्या मजल्यावर वास्तव्यास असून त्यांच्याकडे संबंधित पुरावे सुध्दा आहेत मात्र एसआरएच्या नियमात तरतुद नसल्याने त्यांना अपात्र ठरवून बेघर व्हावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.पंतप्रधान यांनी सन २०२० पर्यंत सर्वांना हक्काचे घरे देण्याची महत्वकांशी योजना आखली व त्या धोरणांतर्गत तत्कालीन मा.मुख्यमंत्री यांनी झोपडपट्टीतील 'पहिला मजला' शासन धोरण सन २०१७ प्रमाणे पात्र करण्याबाबत नव्याने झोपडपट्टी सुधारणा कायदा (स्लम ॲक्ट) धोरण सन २०१७ निर्गमित करुन सन २०११ पर्यंतच्या सर्वांना घरे उपलब्ध करुन देण्याचे निश्चित करण्याचा निर्णय घेण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा रहिवाशांना त्यांच्याकडील कागदपत्रांची पडताळणी करून त्यांना पात्र ठरवून न्याय देण्यात यावा अशी मागणी मा. लोकप्रतिनिधींनी केल्याची माहिती माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्या दरम्यान केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व त्याचे स्वरूप काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (१३-१२-२०२१) :** (१) झोपडपट्टीमध्ये पहिल्या मजल्यावर वास्तव्यास असणाऱ्या झोपडीधारकांचे पुनर्वसन करण्याबाबतची तरतूद महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि व पु.) अधिनियम, १९७१ मध्ये तसेच त्यानुषंगाने निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णय/परिपत्रकामध्ये नाही.

(२) मा.पंतप्रधान महोदयांनी 'सर्वांसाठी घरे २०२२' धोरण जाहीर केले असून त्या अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजना स्वतंत्रपणे राबविण्यात येते.

महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि व पु.) अधिनियम, १९७१ मध्ये सन २०१७ च्या सुधारणा अधिनियमान्वये दि.०१.०१.२०११ रोजी अथवा त्यापूर्वी अस्तित्वात असलेल्या पात्र झोपडीधारकांचे सशुल्क पुनर्वसन करण्याबाबतचे धोरण निश्चित केले आहे.

(३) हे खरे आहे. पहिल्या मजल्यावरील झोपडीधारकांना पात्र ठरवून पुनर्वसन सदनिका वितरित करण्याबाबत लोकप्रतिनिधीकडून मागणी करण्यात आली आहे.

(४) झोपडीच्या पहिल्या मजल्यावरील झोपडीधारकांना झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत पात्र ठरविणे शक्य नसल्याबाबत मा.मुख्यमंत्री महोदयांच्या मान्यतेने मा.लोकसभा सदस्यांना कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई शहर उपनगरात एसआरए प्राधिकरणातर्फे राबविण्यात येत असलेले अनेक एसआरए प्रकल्प अपूर्ण अवस्थेत असल्याबाबत

**(२) ५३३ (०२-०४-२०२०). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर उपनगरात, एसआरए प्राधिकरणातर्फे राबविण्यात येत असलेले अनेक एसआरए प्रकल्प अपूर्ण असल्याने ते वेळेत पूर्ण व्हावेत आणि ही योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी लोकप्रतिनिधी व या क्षेत्रातील तज्ञांची विशेष समिती नेमण्याचे मा. मंत्री महोदयांनी दिनांक २० डिसेंबर, २०१९ रोजी वा त्या सुमारास आश्वासन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई शहर उपनगरातील अपूर्ण असलेल्या एसआरए प्रकल्पाच्या विकास कामांना गती देण्यासाठी दिलेल्या आश्वासनानुसार शासनाने तज्ञांची विशेष समिती गठीत करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (१३-१२-२०२१) :** (१) मुंबई शहर व उपनगरातील अपूर्ण एस.आर.ए. प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी एक विशेष समितीचे गठण करण्याबाबत सन २०१९ च्या हिवाळी अधिवेशनामध्ये चर्चा झाली.

(२) सदर चर्चेच्या अनुषंगाने रखडलेले प्रकल्प मार्गी लावण्यासाठी मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली आतापर्यंत २ बैठका घेण्यात आल्या असून सदर बैठकीतील निर्देशानुसार कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शिळफाटा ते तळोजा (जि.ठाणे) परिसरामधील अनधिकृत गोडाऊनला वारंवार आग लागून जीवित व वित्तहानी होत असल्याबाबत**

**(३) १४७४ (२१-०३-२०२०). श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिळफाटा ते तळोजा (जि.ठाणे) परिसरामधील अनधिकृत गोडाउनला वारंवार आग लागून जीवित व वित्तहानी होत असल्यामुळे अशा गोडाऊन धारकांवर कारवाई करुन कायमस्वरुपी बंद करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी, ठाणे यांना दिनांक १ जानेवारी, २०२० रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने आतापर्यंत किती गोडाऊन धारकांवर कारवाई करुन ते बंद करण्यात आले आहेत व केलेल्या कार्यवाहीचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-१२-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) मा. लोकप्रतिनिधींनी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने आवश्यक त्या कार्यवाहीच्या प्रयोजनार्थ तहसिलदार, ठाणे यांचेमार्फत मुंब्रा प्रभाग समिती, ठाणे मनपा, सार्वजनिक बांधकाम विभाग, पिंपरी व दहिसर ग्रामपंचायत त्याच प्रमाणे महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास दिनांक १७.०६.२०२० रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

शिळफाटा ते तळोजा या रस्त्यालगतच्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या विशेष नियोजन प्राधिकरण क्षेत्रामध्ये मौ. गोठेघर, भंडार्ली, वालिवली, पिंपरी व दहिसर गावांचा समावेश आहे. त्यानुषंगाने वरील गावांमधील अनधिकृत गोडाऊनचे सर्वेक्षण करुन त्यानुसार बांधकाम सर्वेक्षण अहवाल प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर सदर बांधकामाची वैधता तपासून महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ मधील तरतूदीनुसार कार्यवाही करण्याचे प्राधिकरणाच्या स्तरावर नियोजित आहे.

---

**पंतप्रधान आवास योजनेंतर्गत मंजूरी प्राप्त लाभार्थ्यांना निधी न मिळाल्याबाबत**

**(४) १६५४ (१६-०३-२०२०). ॲड.आशिष जयस्वाल (रामटेक) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गरजूंना हक्काचे घर मिळावे म्हणून केंद्र शासनाच्या वतीने पंतप्रधान आवास योजनेंतर्गत नागपूर जिल्हयातील मौदा व पारशिवनी तालुक्यात घरकुलाच्या बांधकामाला नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून मंजूरी प्रदान करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंजूरी प्राप्त लाभार्थ्यांना निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, ग्रामीण भागात माहे जानेवारी ते माहे मे या ५ महिन्यांचा काळात शेतीची फारशी कामे राहत नसल्याने घरांच्या बांधकामास निधी उपलब्धतेकरिता किती कालावधी लागणे अपेक्षित आहे,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (१०-१२-२०२१) :** (१) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रातील मौदा व पारशिवनी तालुक्यात प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) च्या घटक क्र.४ BLC अंतर्गत अनुक्रमे ७१८१ व ३५८३ घरकुले मिळून एकूण १०,७६४ (EWS) घरकुलांना केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समितीने (CSMC) मंजूरी दिली आहे.
(२) व (३) प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत पारशिवनी तालुक्यातील ३५८३ घरकुलांकरिता केंद्र हिश्श्याचा रुपये २१.४९८ कोटी व राज्य हिश्श्याचा संपूर्ण निधी मंजूर करण्यात आला आहे. तसेच मौदा तालुक्यातील ७१८१ घरकुलांकरिता केंद्र हिश्श्याचा रुपये ४२.६५४ कोटी व राज्य हिश्श्याचा पात्र लाभार्थ्यांना १००% निधी मंजूर करण्यात आला आहे.
(४) प्रकल्प वेळेवर पूर्ण करण्याकरिता अभियान संचालनालय म्हणून महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा) कडून पाठपुरावा करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उदभवत नाही.

---

## पुण्यातील दोन विद्यार्थीनींनी शाळेची फी भरली नसल्याने शाळेबाहेर उभे केल्याबाबत

**(५) १६५५ (०९-०४-२०२०). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुण्यातील बंड गार्डन येथील जे.एन.पी.टी. टेक्निकल शाळेने दोन विद्यार्थीनींनी फी न भरल्यामुळे त्यांना दोन महिन्यांपासून शाळेबाहेर उभे केल्याचे दिनांक ६ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने केलेल्या चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१३-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरातील झोपडपट्टीवासीयांच्या पुनर्वसनाबाबत

**(६) १९५७ (२१-०३-२०२०). कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरातील झोपडपट्टीवासीयांचे इन - सीटू पुनर्वसन करण्याबाबत शासनाच्या निर्णयानुसार एम. आय. एल. व एस. आर. ए. अंतर्गत करार झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निर्णयानुसार विमानतळाच्या ६५ एकर जमिनीवर तेथील झोपडपट्टीवासीयांचे पुनर्वसन होणे अपेक्षित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मात्र ६५ एकर जमीन कोणती असणार याबाबत संभ्रम असून एम. आय. एल.कडून सदर जमिनी कुठे व कधी मिळणार आहेत याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-१२-२०२१)** :(१) व (२) मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या जमिनीवरील झोपडपट्ट्यांचे त्याच जागेवर पुनर्वसनासाठी (In Situ) उपलब्ध होणाऱ्या ६५ एकर जागेसंदर्भात केंद्र शासना (एअरपोर्ट ॲथॉरिटी ऑफ इंडिया) च्या मंजुरीच्या अधीन राहून एम. आय. एल. व एस. आर. ए. यांच्यातील सामंजस्य कराराच्या प्रारुपास शासन मान्यता देण्यात आली आहे.
(३) व (४) सदर ६५ एकर जागेची मालकी केंद्र शासनाच्या अखत्यारीत असल्याने जागा उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र शासनाची मान्यता आवश्यक असल्याने एम. आय. एल मार्फत सदर मंजुरीसाठी प्रयत्न सुरू आहेत. केंद्र शासनाची (एअरपोर्ट ॲथॉरिटी ऑफ इंडिया) ची मंजुरी अद्याप अप्राप्त आहे.

---

## नांदुरा व मलकापूर (जि.बुलढाणा) तालुक्यात म्हाडाची गृहनिर्माण योजना मंजूर करणेबाबत

**(७) २२६४ (०६-०४-२०२०). श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदुरा व मलकापूर (जि.बुलढाणा) तालुक्यातील रहिवाशी लोकसंख्या लक्षात घेता आर्थिक दुर्बल घटकातील नागरिकांना स्वतःचे हक्काचे घर घेण्यास मोठ्या आर्थिक अडचणी येत असल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०१९ वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, नांदुरा व मलकापूर तालुक्यात म्हाडाची गृहनिर्माण योजना मंजूर केल्यास आर्थिक दुर्बल घटकातील नागरिकांना मालकी हक्काचे घर घेणे शक्य होईल, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व तद्नुसार नांदुरा व मलकापूर (जि.बुलढाणा) तालुक्यात येथे म्हाडाची गृहनिर्माण योजना मंजूर करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (०९-१२-२०२१)** :(१) आर्थिक दुर्बल घटकातील नागरिकांना स्वत:चे हक्काचे घर देण्यास मोठ्या आर्थिक अडचणी येत असल्याच्या बाबींबाबत कोणताही पत्रव्यवहार या कार्यालयाकडे प्राप्त झालेला नाही. असे म्हाडाने कळविले आहे.
(२) व (३) केंद्रशासनाने जाहिर केलेल्या सर्वांसाठी घरे २०२२ या संकल्पनेवर आधारित प्रधानमंत्री आवास योजनेतील घटक क्र.३ खाजगी भागीदारीद्वारे परवडणाऱ्या घरांची निर्मिती करणे अंतर्गत अमरावती मंडळामार्फत मौजे बुलढाणा, जि.बुलढाणा येथे २६८ गाळे अत्यल्प उत्पन्न गट, २० गाळे मध्यम उत्पन्न गट, १६ गाळे उच्च उत्पन्न गट योजना राबविण्यात येत आहे. तसेच घटक क्र. ४ लाभार्थ्याद्वारे वैयक्तीक स्वरूपात घरकुल बांधणे अंतर्गत अत्यल्प उत्पन्न गटात मलकापूर मध्ये ५५० गाळे व नांदुरा मध्ये ४५३ गाळे अशी एकूण १००३ गाळ्यांची योजना प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील खाजगी माध्यमिक/उच्च माध्यमिक/कनिष्ठ महाविद्यालयेमधील शिक्षकेत्तर कर्मचा-यांमधून संस्थेच्या शाळांमध्ये २५ टक्के शिक्षकांची पदे देण्याबाबतचा प्रस्ताव**

**(८) २३१२ (०८-०४-२०२०). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), डॉ.किरण लहामटे (अकोले) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खाजगी माध्यमिक/उच्च माध्यमिक/कनिष्ठ महाविद्यालया मधील शिक्षकेत्तर कर्मचा-यांमधून अध्ययनाकरिता शैक्षणिक पात्रता धारण करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांना संस्थेच्या शाळांमध्ये २५ टक्के शिक्षकांची पदे देण्याबाबतचा प्रस्ताव मा. शिक्षण संचालक (माध्य व उच्च माध्य) पुणे यांनी दिनांक. २३ ऑक्टोबर,२०१९ व दिनांक. ३० ऑक्टोबर,२०१९ रोजी योग्य त्या शिफारशीसह अप्पर मुख्य सचिव शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडे पाठविला असून तो अद्याप प्रलंबित आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी मा. उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद यांच्या दिनांक १८ जून, २०१९ च्या निर्णयानुसार कायद्यामध्ये आवश्यक तो बदल करण्याकरिता नागपूर विभागाच्या जनप्रतिनिधींनी अप्पर मुख्य सचिव, शालेय शिक्षण यांना दिनांक. २५ आॅक्टाेबर,२०१९ ,दिनांक ११ नोव्हेंबर,२०१९ व दिनांक ०३ डिसेंबर,२०१९ रोजी पत्राद्वारे कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०८-१२-२०२१) :** (१), (२) व (३) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांनी पाठविलेला प्रस्ताव अपूर्ण असल्यामुळे त्यासंदर्भात माहिती मागविण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शहरी भागातील महानगरपालिका क्षेत्रात गृहनिर्माण निर्मिती करण्याबाबतच्या गृहनिर्माण धोरणाबाबत**

**(९) २४४३ (०६-०४-२०२०). श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरासह राज्यातील शहरी भागातील महानगरपालिका क्षेत्रात गृहनिर्माण निर्मिती करण्याबाबतचे 'गृहनिर्माण धोरणा'बाबत शासनाने सन २०१६ मध्ये नेमलेल्या विधानसभा सदस्य समितीने आपला अहवाल शासनास सादर केल्यानंतर उक्त अहवाल म्हाडाने नगरविकास विभागाकडे मंजूरीसाठी पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अहवाल म्हाडाने नगरविकास विभागाकडे मंजूरीसाठी पाठवून अनेक वर्षाचा कालावधी उलटून गेला तरीही अद्याप नगरविकास विभागाकडून मंजूरी देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गृहनिर्माण धोरण अंमलात आल्यावर मुंबई शहरासह राज्यातील शहरी भागातील महानगरपालिका क्षेत्रातील घरांच्या निर्मितीस मोठ्या प्रमाणात चालना मिळू शकेल व गिरणी कामगारांपासून ते सर्वसामान्य लोकांना घरे मिळू शकतील याकरीता किती कालावधीत गृहनिर्माण धोरणास मंजूरी मिळणे अपेक्षित आहे वा त्यानुषंगाने कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-१२-२०२१) :** (१) ते (३) मुंबई शहर व उपनगरातील उपकर प्राप्त / बिगर उपकर प्राप्त इमारती आणि महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाशी संबंधित इमारतींशी निगडीत धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी शासनास सूचना करण्यासाठी शासन गृहनिर्माण विभागाकडील दि. २९/१०/२०१६ रोजीचे शासन निर्णयाद्वारे आठ विधानमंडळ सदस्यांची समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने शासन गृहनिर्माण विभागास अहवाल सादर केला असून समितीने गृहनिर्माण समस्यांचे निराकारण करण्याच्या अनुषंगाने विविध शिफारशी / सूचना केल्या असून बहुतांशी गृहनिर्माण विभागाशी संबंधित असून त्याबाबत गृहनिर्माण विभागामार्फत कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच समितीच्या अहवालास नगर विकास विभागाकडे मंजूरीसाठी पाठविला अशी बाब नसून, समितीने नगर विकास विभागाशी संबंधित मुद्दयांचे अनुषंगाने केलेल्या शिफारशींबाबत कार्यवाही करणेबाबत गृहनिर्माण विभागाकडून नगर विकास विभागास प्राप्त झाल्या आहेत. त्यामध्ये विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ मधील विनियम ३३(७), विनियम ३३(९) मध्ये सुधारणा करण्याची बाब अंतर्भूत असून सदर बाब नगर विकास विभाग, नवि-१ शी संबंधित आहे. तसेच काही मुद्दे महापालिका प्रशासनाशी निगडीत असून नगर विकास विभाग नवि-२ शी संबंधित असून त्याबाबत सदर विभागामार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.

विनियम ३३(७) व विनियम ३३(९) मध्ये सुधारणा करण्याच्या अनुषंगाने म्हाडाकडून प्रस्ताव प्राप्त झाला होता. त्यावर महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१कक) अन्वये फेरबदलाची वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन शासन नगर विकास विभागाने दि. ८/०७/२०२१ रोजीच्या अधिसूचनेद्वारे विनियम ३३(७) व विनियम ३३(९) चे फेरबदल प्रस्तावास शासनाने अंतीम मंजूरी दिली आहे.

---

**राज्यातील वर्धा, भंडारा, वाशीम, हिंगोली व जालना या जिल्ह्यांमध्ये वयाचे ६० वर्ष पूर्ण केलेल्या वृद्धांसाठी आयुष्यमान भव योजना राबविण्याबाबत**

**(१०) २९९१ (२०-०३-२०२०). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वर्धा, भंडारा, वाशीम, हिंगोली व जालना या जिल्ह्यांमध्ये वयाचे ६० वर्ष पूर्ण केलेल्या वृद्धांसाठी आयुष्यमान भव योजना राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेचे स्वरूप व कार्यपद्धती काय आहे, तसेच सदर योजनेच्या माध्यमातून ५ जिल्ह्यांतील किती वयोवृद्धांना या योजनेचा लाभ मिळणार आहे,

(३) असल्यास, राज्यातील अन्य जिल्ह्यांमध्ये ही योजना लागू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (१०-१२-२०२१) :** (१), (२) व (३) आयुष्यमान भव योजना सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे राबविण्यात येत नाही. तथापि, “आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना” ही केंद्र शासनाची आरोग्य विमा योजना महाराष्ट्र राज्यात दिनांक २३ सप्टेंबर २०१८ पासून महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजनेसह राज्यातील अंगीकृत शासकीय व खाजगी रुग्णालयामध्ये एकत्रितपणे राबविण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भिवंडी महानगरपालिका क्षेत्रातील (जि.ठाणे) पोगाव व भाडेगाव येथील आदिवासी पाडयांतील कुटुंबांना न्याय देण्याबाबत

**(११) ३२६१ (२१-०३-२०२०). अॅड.माणिकराव कोकाटे (सिन्नर), श्री.सुनिल भुसारा (विक्रमगड), श्री.अतुल बेनके (जुन्नर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी तालुक्यातील (जि.ठाणे) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रातील बांधकामासंदर्भात मा.उच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकेत मा.उच्च न्यायालयाने तालुक्यातील अनेक कामे अनधिकृत ठरवून अशा अनधिकृत बांधकामांसंदर्भात कारवाई करण्याचे आदेश दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भिवंडी महानगरपालिका क्षेत्रातील पोगाव व भाडेगाव येथील आदिवासी पाडयावर राहणाऱ्या १३० आदिवासी कुटुंबियांच्या घरांवर भिवंडी महानगरपालिकेच्यावतीने कारवाई करण्यात आली असल्याचे दिनांक १२ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर आदिवासी कुटुंबे मागील तीन पिढयांपासून त्याच ठिकाणी राहत असल्यामुळे त्यांना महानगरपालिकेच्या या कारवाईतून वगळावे अशी मा.आयुक्त, भिवंडी महानगरपालिका, मा.जिल्हाधिकारी, ठाणे तसेच मा.प्रधान सचिव,नगरविकास विभाग यांना निवेदने देऊन सदर आदिवासी कुटुंबांनी मागणी केली अहे आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनामार्फत उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुषंगाने सदर आदिवासी कुटुंबियांना न्याय देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-१२-२०२१) :**(१) होय, हे खरे आहे,

(२) अंशत: खरे आहे.

प्रभाग समिती क्र. १ च्या कार्यक्षेत्रातील हरित क्षेत्र (ग्रीन झोन) मधील ब्राम्हणपाडा, म्हसकर पाडा, पोगांवपाडा या ठिकाणी एकुण २५ अनधिकृत बांधकामधारक यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २६०(१अे) (अे)(बी) व महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५२ ते ५५ अन्वये दिनांक ०८/०८/२०१९ रोजी नोटीस

बजाविण्यात आल्या आहेत. मा. ठाणे व भिवंडी न्यायालय यांनी दिनांक २२/०८/२०१९ रोजी सुनावणी घेऊन उक्त बांधकामे अनधिकृत असल्याचे आदेश देण्यात आले. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २६८ अन्वये बिगरपरवाना अनधिकृत मिळकतीचा वापर थांबवून मिळकत तात्काळ रिकामी करणे बाबत नोटीस बजाविण्यात येऊन कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. पोलीस बंदोबस्तात बांधकाम निष्कासनाची कारवाई प्रस्तावित केली होती. तथापि रहिवाश्यांच्या प्रचंड विरोधामुळे निष्कासनाची कारवाई करता आली नाही.
भाडेगाव हे गांव भिवंडी मनपा क्षेत्रात नाही.
(३) होय, हे खरे आहे.
(४) व (५) सदर प्रकरणी मौजे पोगांव परिसरातील जुनी घरे व वाढती लोकसंख्या विचारात घेऊन महानगरपालिकेने मौजे पोगांव परिसरातील मंजूर विकास योजने नुसार असलेला हरित क्षेत्र वापर विभाग बदलून तो रहिवास वापर विभाग करण्याचा निर्णय महासभा ठराव क्र. २१४ दि. २७/११/२०१९ अन्वयें पारीत केला असून सदर ठरावानुसार मौजे पोगांव या परिसरामध्ये मंजूर विकास आराखड्यानुसार दर्शविण्यात आलेल्या ग्रीन झोनचा (हरित पट्टा) वापर बदलून त्याऐवजी रहिवास वापर करणेकामी म.प्रा.व.नं.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेर बदलासाठी जाहीर नोटीस दि. २० जानेवारी, २०२० रोजी दैनिक वृत्त पत्रात प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्यावरील प्राप्त सूचना हरकतीनुसार पुढील कार्यवाही करून सदरचे क्षेत्र ग्रीन झोन (हरित पट्टयातून) रहिवास वापरामध्ये बदल करण्याचा प्रस्ताव भिवंडी-निजामपूर महानगरपालिकेमार्फत राज्य शासनाकडे सादर करण्यात येत आहे.

---

**पालघर जिल्ह्यातील एमएमआरडीएचे कार्यक्षेत्र गुजरात राज्याच्या सीमेपर्यंत वाढविण्याबाबत**

**(१२) ३२७५ (०५-०४-२०२०). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यातील एमएमआरडीएचे कार्यक्षेत्र गुजरात राज्याच्या सीमेपर्यंत वाढविण्याबाबतची मागणी जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी शासनाकडे वेळोवेळी केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर भागामध्ये आदिवासी बांधवांची वस्ती मोठ्या प्रमाणात असल्याने तसेच तेथील औद्योगिकरणाचा व लोकसंख्येचा वेग अपेक्षेपेक्षा वाढल्यामुळे तेथील नागरी सुविधा पुरविणाऱ्या यंत्रणावर ताण पडत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे,
(२) होय, हे खरे आहे.
(३) शासनाच्या दि. ०९/०९/२०१९ रोजीच्या अधिसूचने अन्वये पालघर जिल्ह्यातील संपूर्ण पालघर तालुका, वसई तालुक्यातील उर्वरीत भाग आणि रायगड जिल्ह्यातील अलिबाग, पेण, पनवेल व खालापूर तालुक्यातील उर्वरीत गावांचा समावेश करून मुंबई महानगर प्रदेशाची हद्दवाढ करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (PMRDA) अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजनेच्या घरांच्या कामांना मान्यता देण्याबाबत

**(१३) ३७०८ (०५-०४-२०२०). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (PMRDA) अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील सुमारे ३० हजारांहून अधिक घरांना दिनांक १० ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास मान्यता मिळाली असून अद्याप ५० हजारांहून अधिक अर्ज प्रलंबित आहेत, हे खरे हे काय,

(२) असल्यास, १ लाख नागरिकांना घरे देण्यासाठी शासन विचाराधीन असून या पूर्वी मान्यता मिळालेल्या घरांची कामेच अद्याप सुरु झालेली नाहीत, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, उक्त घरांच्या कामांना मान्यता देण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (१०-१२-२०२१) :** (१) पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रातील ग्रामीण भागातून प्रधान मंत्री आवास योजनेच्या घटक क्र. ४ BLC अंतर्गत ऑनलाईन पद्धतीने ८४,२२१ अर्ज प्राप्त झाल्याचे पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने कळविले आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी प्रधानमंत्री आवास योजनेच्या घटक क्र. ४ BLC अंतर्गत अर्ज करणा-या व पात्रतेचा निकष पूर्ण करणा-या अर्जदारांना मान्यता देणे तसेच पात्र लाभार्थ्यांच्या अर्जांची छाननी करुन सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे, त्यास मान्यता घेणे व बांधकाम सुरु करण्यास परवानगी देणे अशा विविध टप्प्यांवर पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे (PMRDA) विभागीय कार्यालय दौंड तालुक्यात सुरु करण्याबाबत

**(१४) ३७११ (०५-०४-२०२०). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागातर्फे दिनांक ३१ मार्च, २०१५ रोजी वा त्या सुमारास कायदेशीर अधिकार असलेली एक स्वायत्त आर्थिक 'सामुदायिक संस्था' म्हणून पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे गठन करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दौंड तालुक्यातील सुमारे ५१ महसुली गावांचा यामध्ये समावेश करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुख्य कार्यालय, पुणे येथे असल्याने नागरिकांना त्यांच्या शंकाचे समाधान व निरसन करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे (PMRDA) विभागीय कार्यालय दौंड तालुक्यात सुरु करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिकांनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त कार्यालय दौंड तालुक्यात सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-१२-२०२१)** :(१) व (२) होय, हे खरे आहे
(३) नाही, हे खरे नाही
(४) हे खरे आहे
(५) व (६) धोरणात्मक बाब असल्यामुळे प्राधिकरण सभेपुढे मान्यतेस्तव ठेवण्यात येत आहे.

---

**राज्यात ५ लाख ४६ हजार १२८ कोटी रुपयांच्या मोठ्या प्रकल्पांचा आढावा घेण्यात आल्याबाबत**

**(१५) ३९७८ (०६-०४-२०२०). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अलिकडेच ५ लाख ४६ हजार १२८ कोटी रुपयांच्या मोठ्या प्रकल्पाचा आढावा घेण्याचे काम माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान सुरू झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मेट्रो-३ कारशेडच्या अंदाजे १२८ कोटी रुपये कामाला स्थगिती देण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अंदाजे १.०८ लाख कोटी रुपयांचा मुंबई ते अहमदाबाद ५०८ कि.मी.अंतर असणारा महत्वाकांक्षी बुलेट ट्रेन "ड्रीम प्रोजेक्ट" ही स्थगित करण्याबाबत शासन स्तरावर विचार सुरू आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, ८१ टक्के खर्चाचा भार जपान इंटरनॅशनल को-ऑपरेशन एजेंसी (जीका) मार्फत उचलला जाणार आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर कामाकरिता आतापर्यंत जमीन अधिग्रहण/हस्तांतरण, सर्वेक्षण, मनुष्यबळ, यंत्र सामग्री इत्यादींवर झालेला प्राथमिक खर्च,अतिरिक्त भार कशाप्रकारे भरून काढणार याबाबत भविष्यात कोणती धोरणात्मक कार्यवाही शासनामार्फत करण्यात येणार आहे,
(६) असल्यास, भविष्यात सदरहू निर्णयामुळे राज्याच्या सर्वांगीण विकासाला खिळ बसणार असल्याने याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-१२-२०२१) :** (१) होय. राज्य शासनामार्फत राबविण्यात येत असलेल्या महत्वाच्या योजना तसेच पायाभूत प्रकल्पांचा मा. मुख्यमंत्री महोदयांकडून वेळोवेळी आढावा घेण्यात येत असतो.

(२) मुंबई मेट्रो लाईन-३ प्रकल्पाच्या मूळ मंजूर आराखड्यानुसार आरे कॉलनी येथील कारशेडच्या स्थापत्य कामाची स्वीकृत किंमत सुमारे रू. ३२८.२६ कोटी इतकी आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल असलेल्या रिट याचिकेच्या अनुरोधाने शासनाची भूमिका मांडावयाची असल्याने कारशेडसाठी निश्चित करणेत आलेल्या जागेवर उर्वरित झाडे तोडणे आणि त्या अनुषंगाने पुढील इतर कोणतीही कार्यवाही शासनाचे पुढील आदेश होईपर्यंत न करणेबाबत दिनांक २९.११.२०१९ रोजी स्थगिती देण्यात आली होती.

(३) हे खरे नाही.

(४) मेट्रो मार्ग-३ प्रकल्प किंमतीच्या ५७% आणि मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाच्या एकूण खर्चाच्या ८१% वित्तीय भार जायकामार्फत वहन करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) व (७) राज्यामध्ये राज्य शासनामार्फत तसेच केंद्र शासनाच्या सहकार्याने राबविण्यात येत असलेले प्रकल्प विहीत कालावधीत पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाकडून सर्वोतोपरी प्रयत्न करण्यात येत आहेत.

---

## धुळे जिल्हयातील श्री. भाऊसाहेब हिरे वैद्यकीय महाविद्यालयास हाफकीन संस्थेकडून देण्यात येणाऱ्या लसी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१६) ४६४१ (२०-०३-२०२०). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्हयातील श्री. भाऊसाहेब हिरे वैद्यकीय महाविद्यालयात हाफकीन संस्थेकडून देण्यात येणाऱ्या प्रतिबंधात्मक लसी व औषधे गेल्या वर्षभरापासून वेळेवर मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर हाफकीन संस्थेकडून देण्यात येणाऱ्या लसी तातडीने उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अमित विलासराव देशमुख (०७-१२-२०२१) :** (१) व (२) श्री. भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, धुळे या संस्थेकरीता सन २०१९-२०२० या वर्षासाठी लागणा-या प्रतिबंधात्मक लसी व औषधे यांचा तूटवडा झालेला नसून संस्थास्तरावर आवश्यक लसी व औषधे उपलब्ध आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील विनाअनुदान तत्वावरील शाळांमधून अनुदानित तत्वावरील शाळेतील पदावर शिक्षकेतर कर्मचा-यांच्या बदल्यांबाबत

**(१७) ४८०० (१०-०४-२०२०). श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संस्थेच्या सेवाजेष्ठतेनुसार केवळ सेवानिवृत्तीमुळे रिक्त होणा-या पदावर विनाअनुदानित शाळांमधून अनुदानित तत्वावरील शाळेतील पदावरील बदलीस मान्यता प्रदान करण्याबाबत शासन निर्णय दिनांक २८.जून २०१६ नुसार निर्णय झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास विनाअनुदानित तत्वावरील शिक्षकाची नियुक्ती होवून ५ वर्षे झाली असेल तर त्याला प्रती वर्षी २०% नुसार वाढ होवून ५ व्या वर्षी त्याला १००% अनुदान मिळेल, हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास एखादा शिक्षकाची विनाअनुदानित सेवा ९ किंवा १० वर्षे झालेली असेल किंवा ५ वर्षे सेवा झाली असेल तर त्यांना देखील २०% च अनुदान मिळेल, हे ही खरे आहे काय.

(४.) असल्यास शासन निर्णय दिनांक २८ जून २०१६ मध्ये केवळ शिक्षक कर्मचारी असाच उल्लेख असल्यामुळे आज ब-याच शाळांमध्ये सेवानिवृत्तीमुळे शिक्षकेतर पदे रिक्त असून देखील शिक्षकांप्रमाणे शिक्षकेतर कर्मचा-यांची विनाअनुदानित विभागाकडून अनुदानित विभागाकडे बदली करता येत नाही, हे ही खरे आहे काय.

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**प्रा. वर्षा गायकवाड (०८-१२-२०२१) :** (१) ,(२) व (३) शासन अधिसूचना दि. ०८ जून, २०२० अन्वये शिक्षकांची विनाअनुदानित किंवा अंशतः अनुदानित शाळा अथवा तुकडीमधून अनुक्रमे अंशतः अनुदानित किंवा पूर्णतः अनुदानित शाळा अथवा तुकडीतील रिक्त पदांवर बदलीचे धोरण सुधारित करण्यात आले आहे.

४) व ५) होय, हे खरे आहे, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बदलीचे धोरण ठरविण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

---

## अकोला जिल्हा शासकीय रुग्णालयात जन्माचा दाखला मिळविण्यासाठी नागरिकांना वारंवार कार्यालयात ये-जा करावे लागत असल्याबाबत

**(१८) ४८७१ (२२-०३-२०२०). श्री.गोवर्धन मांगीलाल शर्मा (ऊर्फ) लालाजी (अकोला पश्चिम), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हा शासकीय रुग्णालयात जन्माचा दाखला मिळविण्यासाठी नागरिकांना वारंवार कार्यालयात ये-जा करावे लागत असल्याचे माहे डिसेंबर २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदरहू रुग्णालयात गरीब/गरजू रुग्णांचे आर्थिक शोषण होत असल्याची तक्रार दिनांक १५ जानेवारी, २०२० रोजी वा त्यादरम्यान जिल्हा पोलीस अधिक्षक, अकोला यांचेकडे करण्यात आली हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्रस्त नागरिकांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे वैद्यकीय अधिक्षकांना निवेदन सादर केले असून संबंधित कक्ष प्रमुखांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले तदनुषंगाने संबंधीत दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे?

**श्री. अमित विलासराव देशमुख (०७-१२-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) होय. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, अकोला च्या आवारात काही अनधिकृत व्यक्ती रुग्णसेवक असल्याचे सांगून गरीब/गरजू रुग्णांचे आर्थीक शोषन करत असल्याची बाब निदर्शनास आल्याने अधिष्ठाता यांनी दिनांक १५.०१.२०२० रोजी पोलीस अधिक्षक, अकोला यांच्याकडे लेखी तक्रार केली आहे.
(३) याबाबत लेखी तक्रार रुग्णालय प्रशासनाकडे प्राप्त झालेली नाही.
(४) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अकोला येथे जन्म दाखले वितरित करण्यासाठी बाह्यस्त्रोतामार्फत एका कर्मचा-याची नियुक्ती करण्यात आली आहे. सदर कर्मचारी दिनांक २६.१२.२०१९ रोजी रजेवर असल्याने सदर दिवशी जन्म दाखले देण्यात आले नाहीत. याबाबत रुग्णालय प्रशासनाकडून सदर कर्मचा-यास सक्त ताकीद देण्यात आली आहे.

---

## मुंबई महानगर विकास प्रधिकरणामार्फत भाईंदर खाडीवरील पूल बांधण्याबाबत

**(१९) ६१०४ (०६-०४-२०२०). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगर विकास प्रधिकरणामार्फत भाईंदर खाडीवरील पूल बांधण्याचा प्रस्ताव मागील अनेक वर्षांपासून मंजुर असुनही अद्याप कामास सुरवात झालेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई मेट्रो रेल्वे दहिसरपर्यंत आणण्याचा शासनाचा प्रस्ताव असून दहिसरपर्यंत येणाऱ्या मेट्रो रेल्वे प्रकल्पास वसई-विरारपर्यंत आणण्यासाठी भाईंदर खाडीवर मंजूर असलेल्या पुलाच्या कामामध्ये सदरहु पुलाचा समावेश करण्याबाबतच्या मागणीचे निवेदन मा.मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक १३ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहु निवेदनातील मागण्यांचे स्वरुप काय आहे व सदरहु निवेदनातील मागण्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
सदर कामासाठी आवश्यक परवानग्या जसे की, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड (MMB), भारतीय अंतर्देशिय जलमार्ग प्राधिकरण (IWAI) व महाराष्ट्र सागरी नियंत्रण क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण (MCZMA), वन विभाग, मिठागराच्या जागेचे भूसंपादन इ. बाबींमुळे कामास विलंब झाला आहे.

(२) हे खरे आहे.
(३) भाईंदर खाडीवरील पुलाच्या कामात मेट्रो रेल्वेसाठी लागणाऱ्या पुलाचा समावेश करुन मंजूर पुलाच्या कामासाठी लागणारा निधी उपलब्ध करुन देण्याबाबत मा. लोकप्रतिनिधींनी निवेदन केले आहे.

सदर भाईंदर खाडीपुलाच्या कामामध्ये मेट्रो रेल्वे प्रकल्प पूलाचा समावेश करण्याबाबत नियुक्त केलेल्या सल्लागार मे. स्टुप कन्सल्टंट प्रा.लि. मार्फत सुसाध्यता अभ्यास (feasibility study) करण्यात आला होता व याबाबत सल्लागाराने ६ विविध पर्यायाचा अभ्यास केला आणि तांत्रिकदृष्टया सुसाध्य नाही असे कळविले आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मेट्रो मार्ग-१३ (मीरा भाईंदर ते वसई विरार) चा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी मे. दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन (DMRC) यांची सल्लागार म्हणून ऑगस्ट, २०१८ मध्ये नियुक्ती केली असून सदर काम प्रगतिपथावर आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**राजुरा (जि.चंद्रपूर) तालुक्यातील जिल्हा परिषद हायस्कूल तथा कनिष्ठ महाविद्यालयातील पदे रिक्त असल्याबाबत**

**(२०) ६१६९ (१०-०४-२०२०). श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजुरा (जिल्हा चंद्रपूर) तालुक्यातील जिल्हा परिषद (माजी शासकीय) हायस्कूल तथा कनिष्ठ महाविद्यालय राजुरा येथे नियमित अधिव्याख्याताची पदे रिक्त असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रिक्त पदे भरण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी कडून निवेदनाद्वारे मागणी केली हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०८-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) संबंधित विद्यालयातील रिक्त पदांवर तासिका तत्वावर शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच रिक्त पदे भरण्याची कार्यवाही जिल्हा परिषद, शिक्षण विभाग, प्राथमिक यांच्या स्तरावर सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील शासकीय दंत रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना रुग्णालय प्रशासनामुळे नाहक त्रास होत असल्याबाबत**

**(२१) ६६२२ (१३-०४-२०२०). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील फोर्ट विभागातील शासकीय दंत रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना रुग्णालय प्रशासनामुळे नाहक त्रासाला सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयात रुग्णांना उपचारासाठी वापरण्यात येणाऱ्या सामुग्रीचा तुटवडा असून विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी देण्यात येणारी सामुग्री देखील मुदत संपल्यानंतरची आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अमित विलासराव देशमुख (०७-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**(जि. नाशिक) येथील जिल्हा रुग्णालयात खाजगी व्यक्तींकडून शवविच्छेदन कक्षातून पैशांची होत असलेली मागणी**

**(२२) ७४२० (१३-०४-२०२०). श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील जिल्हा रुग्णालयात शवविच्छेदन कक्षात ३ वर्षापासुन अनोळखी व्यक्ती राजरोसपणे काम करत असुन शवविच्छेदन वेळेत करण्यासाठी नातेवाईकांशी संपर्क करुन पैशांची मागणी होत असल्याचा प्रकार माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घटनेकडे जिल्हा रुग्णालय प्रशासनाचे दुर्लक्ष होत असुन जिल्हा रुग्णालयाच्या वरिष्ठ अधिका-यांकडुन जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (१३-१२-२०२१) :** (१) नाही, हे खरे नाही.

(२), (३) आणि (४) प्रश्न उदभवत नाही.

---

**मुंबईतील आरे मेट्रो - ३ कारशेड स्थगिती उठविण्याबाबत**

**(२३) ९०१३ (२८-०५-२०२०). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण)** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आरे कॉलनीतील मेट्रो ३ च्या कारशेडकरीता निश्चित करण्यात आलेल्या जागेवर पर्यावरणीय समतोल साधणे, कारशेडचे बांधकाम करणे व त्या परिसरातील वृक्ष संपदा जतन करणे याबाबतचा अहवाल सादर करण्याकरीता, गठीत करण्यात आलेल्या समितीने दिनांक २८ जानेवारी, २०२० रोजी वा त्या सुमारास अहवाल शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू समितीने अहवालात केलेल्या शिफारशींचे थोडक्यात स्वरूप काय आहे,

(३) असल्यास, सदरहू अहवालातील शिफारशींनुसार मुंबईतील आरे मेट्रो - ३ कारशेड स्थगिती उठविण्याबाबत शासनाकडून कोणता धोरणात्मक निर्णय घेण्यात आला वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-१२-२०२१) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) सदरहू समितीने खालीलप्रमाणे शिफारशी केलेल्या आहेत:

अ) आरे दूग्ध कॉलनीतील सध्याच्या ठिकाणी कारशेड बांधकामाला एमएमआरसीएलला परवानगी द्यावी, डेपोचे काम त्वरेने करण्यासाठी अतिरिक्त शक्य त्या उपाययोजना करण्यात याव्यात.

आ) मूळ आरे दुग्ध वसाहतीच्या क्षेत्रात कोणताही वनीकरण किंवा गैर-संवर्धन विकास त्याच्या आकाराचा विचार न करता तपशीलवार 'पर्यावरण प्रभाव मूल्यांकन' च्या अधीन असावा.

इ) दुग्ध विकास विभागाने आरे वसाहतीतील तलाव व उद्यानांचे पुनरुज्जीवन करून स्वच्छता करावी आणि देखभालीची काळजी घ्यावी.

ई) आरे कॉलनीचा परिसर आधीच संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या 'इको सेन्सिटीव्ह झोन'मध्ये समाविष्ट केला गेला असल्याने यापुढील कोणताही विकास 'देखरेख समिती' च्या छाननीच्या व अंमलबजावणीपूर्व मंजुरी अधीन असेल. अधिसूचित 'इको-सेंसिटिव्ह झोन'चा झोनल मास्टर प्लॅन तयार करणे आणि आवश्यक खबरदारी घेणे बंधनकारक आहे.

(३) व (४) समितीचा अहवाल अधिक्रमित करुन मुख्य सचिव समितीचा अहवाल स्वीकारण्यात आला आहे. त्यामुळे जानेवारी, २०२० ला सादर झालेल्या अहवालावर कार्यवाहीचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**यवतमाळ येथील वंसतराव नाईक शासकीय रूग्णालयाला हायड्राक्सक्युरी गोळया उपलब्ध करून देण्याबाबत**

**(२४) १०८२२ (०३-०६-२०२०). डॉ.अशोक उईके (राळेगाव), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ येथील वसंतराव नाईक शासकीय रूग्णालयामध्ये जिल्हयातुन सिकलसेल, ॲनिमीया, थॅलेसिमीया या आजाराचे रूग्ण तपासणी व औषध घेण्यासाठी येत असतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांना देण्यात येणा-या हायड्राक्सक्युरी या गोळया हाफकीन कंपनीकडुन रूग्णालयाला पुरविण्यात येत असून या गोळयाचा पुरवठा मर्यादित स्वरुपात करण्यात येत असल्याने सद्या या गोळया रूग्णालयामध्ये उपलब्ध नसल्याचे दिनांक १७ मे, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यवतमाळ जिल्हयामधील अनेक रूग्ण हे सिकलसेल ॲनेमीया या आजाराने ग्रस्त असल्याने गरजू रूग्णांना या गोळया उपलब्ध होत नाहीत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,त्यानुसार वसंतराव नाईक शासकीय रूग्णालयामध्ये येणा-या सिकलसेल व ॲनेमीया या आजाराच्या रुग्णाना हायड्राक्सक्युरी या गोळया उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अमित विलासराव देशमुख (०७-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे **.**
(२), (३) व (४) श्री. वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय , यवतमाळ या संस्थेकरिता सिकलसेल आजारावरील हायड्राक्सक्युरी औषधीची सन २०१८-१९ या वर्षाकरिता ८०,००० व सन २ ० १९-२० या वर्षाकरिता १,६०,००० इतक्या गोळ्यांची मागणी मे . हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळ, मुंबई यांच्याकडे नोंदविण्यात आली होती. त्यानुसार मे. हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळ, मुंबई यांचेमार्फत दि .१५.०६.२०२० रोजी १,६०,००० इतक्या गोळ्यांचा पुरवठा झालेला आहे. सद्यस्थितीत सदर औषधी संस्थास्तरावर उपलब्ध असून गरजू रुग्णांना देण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## झोपडीवासीयांना ३०० चौरस फुटांची घरे मिळण्याकरिता उपमुख्य अभियंत्यांच्या नेतृत्वाखाली स्वतंत्र कक्ष स्थापनेचा निर्णय रद्द करण्याबाबत

**(२५) ११३३४ (१७-०९-२०२०). श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) झोपडीवासीयांना २६९ ऐवजी ३०० चौरस फुटांची घरे मिळण्यातील विलंब दूर करण्यासाठी शासनाने उपमुख्य अभियंत्यांच्या नेतृत्वाखाली स्वतंत्र कक्ष सुरू केला असून सदर प्रकरणे एक महिन्यात निकाली काढण्याचे आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि.व. पु.) अधिनियम, १९७१ च्या कलम ३ के व ३ स मधील तरतुदीनुसार सदर कक्ष स्थापन करण्यात आला असल्याने चटईक्षेत्र वितरणाबाबतचा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा अधिकार यामुळे डावलण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक १३ मे, २०२० रोजी वा त्या सुमारास शुद्धीपत्रकान्वये विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली डी सी आर नुसार परवानग्या, आवश्यक त्या शिथिलता तसेच वाढीव चटई क्षेत्रासहित सुधारित आशयपत्रे /आराखडे मंजूर करण्याचे अधिकार या कक्षाकडे देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर कक्ष स्थापन करण्याबाबत अधिनियमामध्ये कोणतीही तरतूद नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्राधिकरणाच्या स्थापनेवेळी विधानमंडळाने घेतलेले निर्णय व वेळोवेळी न्यायालयांनी दिलेले निर्णय पाहता यामध्ये विधानमंडळ तसेच न्यायालयाचा अवमान झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, या निर्णयामुळे एफ.एस.आय च्या अनुषंगाने गैरव्यवहाराला चालना मिळण्याची ही शक्यता असल्याने सदर कक्ष स्थापनेचा निर्णय रद्द करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (१३-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने मंजुरी दिलेल्या आणि बांधकाम सुरु असलेल्या २६९ चौ.फूट आकारमानाच्या पुनर्वसन सदनिका ३०० चौ.फूटात रुपांतरित करण्याबातची सर्व प्रकरणे कालबध्दरित्या निकाली काढण्यासाठी महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि व पु.) अधिनियम, १९७१ च्या कलम ३ के मधील तरतुदीस अनुसरुन स्वतंत्र कक्ष स्थापन करण्याचा निर्णय दि.१९.०३.२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे. सदरचा निर्णय हा प्रकरणे कालबध्दरित्या निकाली काढण्याच्या उद्देशाने घेण्यात आलेला असल्याने मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा अधिकार डावलण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) होय, हे खरे आहे.

(४) महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि.व पु.) अधिनियम, १९७१ च्या कलम ३ के नुसार आदेश निर्गमित केलेले आहेत.

(५), (६) व (७) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बीड नगरपालिकेने प्रधान मंत्री आवास योजनेतील घरकुल वाटपात गैरव्यवहार केल्याबाबत**

**(२६) १२३७१ (१०-०७-२०२०). श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रधान मंत्री आवास योजने अंतर्गत घरकुल योजना राबविताना बीड नगरपालिकेने मोठ्या प्रमाणावर अनियमितता व भ्रष्टाचार केल्यामुळे शहरातील पात्र लाभार्थी योजनेच्या रास्त लाभापासून वंचित राहिले असून प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी शहरातील नागरिकांनी व पदाधिकाऱ्यांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, योजनेतील घरकुल बांधकामासाठी डी.पी.आर. क्र .१ व २ नुसार सुमारे ७ कोटी रुपयांहून अधिकचा निधी बीड नगरपालिकेकडे जमा असताना नगरपालिकेने सुमारे वर्षभराचा कालावधी पूर्ण होऊनही लाभार्थ्यांना अद्याप नियमाप्रमाणे बांधकामाचा दुसरा हप्ता वाटप केला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, योजनेतील पात्र लाभार्थी अतिशय गरीब असून त्यांना घरे नाहीत अशा परिस्थितीत त्यांनी बांधकाम केलेल्या घरकुलाचे पैसे नगरपालिकेने अदा करण्यास अक्षम्य विलंब केल्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ अली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, योजनेचा लाभ देताना राबविण्यात आलेली बेकायदेशीर प्रणाली, पैसे घेऊन निवडलेले लाभार्थी आणि लाभार्थ्यांना निधी उपलब्ध करण्यास झालेली अनियमितता याची चौकशी करून दोषींविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, शहरातील पात्र लाभार्थ्यांना योजनेचा रास्त लाभ मिळावा म्हणून शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (०८-१२-२०२१) :**(१)सदर प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी प्राप्त झाली नसल्याचे बीड नगरपालिकेने कळविले आहे.
(२) हे खरे नाही.
बीड नगरपालिकेने प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत मंजूर डी.पी.आर क्र. १ व २ साठी प्राप्त निधीतून नियमानुसार पहिल्या व दुसरा हप्त्याचे वाटप केले आहे. बीड नगरपालिकेस वितरीत करण्यात आलेल्या निधीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे:-

रुपये कोटीत

| मंजूर घरकुले | केंद्र हिस्सा | | राज्य हिस्सा | |
|---|---|---|---|---|
| | अनुज्ञेय निधी | मंजूर निधी | अनुज्ञेय निधी | मंजूर निधी |
| DPR क्र. १ १०९ घरकुले | १.६३५ | ०.६४२ | १.०९० | १.०९० |
| DPR क्र. २ ९१० घरकुले | १३.६५० | ५.४४८ | ९.१०० | ७.६५० |
| एकूण | १५.२८५ | ६.०९ | १०.१९ | ८.७४ |

उपरोक्त तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे केंद्र हिश्श्याचा रुपये ६.०९ कोटी व राज्य हिश्श्याचा रुपये ८.७४ कोटी असा एकूण रुपये १४.८३ कोटी इतका निधी बीड नगरपालिकेस मंजूर करण्यात आला आहे४
(३), (४) व (५) सदर योजनेंतर्गत बीड नगरपालिका क्षेत्रात लाभार्थी निवड नियमानुसार करण्यात आली असून, पात्र लाभार्थ्यांना निधी वितरण शासनाच्या कार्यपद्धती व नियमानुसार करण्यात आले आहे, असे अभियान संचालक, प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) यांनी कळविले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोरोना संसर्गामुळे जाहिर केलेल्या टाळेबंदीमुळे आर्थिक संकटात सापडलेल्या चित्रपटगृह मालकांना मदत मिळणेबाबत.**

**(२७) १२८१८ (०९-०९-२०२०). श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना संसर्गामुळे जाहिर केलेल्या टाळेबंदीमुळे चित्रपटगृहांचा व्यवसाय डबघाईला आलेला असताना ओ.टी.टी. या तिसऱ्या वाहीनीमुळे अजुनच फटका बसणार असल्याने काही दिवस चित्रपटगृहे (थियटर) सुरु होणार नसल्यामुळे चित्रपट निर्मात्यांनी ओ.टी.टी. ह्या तिसऱ्या वाहीनींवर चित्रपट प्रदर्शित केल्यामुळे चित्रपटगृह मालकांचे आर्थिक नुकसान होणार असल्याचे दि.१७ मे, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ओ.टी.टी. कंपन्यांच्या मालकांकडून कराच्या स्वरुपात शासनास महसुल प्राप्त होत असल्यास अद्यापर्यंत किती महसुल प्राप्त झाला,

(३) असल्यास, ओ.टी.टी. ह्या तीसऱ्या वाहीनीवर चित्रपट प्रदर्शित करण्याचे नियम व अटी काय आहेत तसेच सदर वाहीनी कायदेशीर बाबींची पुर्तता करुन चित्रपट प्रदर्शित करीत आहेत काय,

(४) असल्यास, दिनांक १० जून २०२० पर्यंत किती चित्रपट प्रदर्शित केले आहेत व प्रदर्शित करणार आहेत,

(५) असल्यास, आर्थिक संकटात सापडलेल्या चित्रपटगृह मालकांना दिलासा मिळण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येणार आहेत,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अमित विलासराव देशमुख (०३-०२-२०२१) :** (१) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(२) ॲमेझॉन सेलर सर्व्हिसेस प्रा.लि. व नेटफ्लिक्स एन्टरटेनमेंट सर्व्हिस इंडिया एलएलपी यांचेकडून दि.१.७.२०१७ ते १२.५.२०२१ या कालावधीत रु.४६७,,२८,८५,३२५/- (रुपये चारशे सदुसष्ठ कोटी अठ्ठावीस लाख पंच्याऐंशी हजार तीनशे पंचवीस) इतका कर भरणा केलेला आहे.

(३) गृह विभागामार्फत केवळ महाराष्ट्र चित्रपटगृह (विनियमन) नियम, १९६६ मधील नियम ६ नुसार चित्रपटगृहाच्या स्थान निश्चितीस तर, नियम १०१ नुसार चित्रपटगृह परवान्यास मंजूरी देण्यात येते.

(४) अशी कोणतीही योजना लागू नाही. मात्र एक पडदा चित्रपटगृह चालकांच्या विविध मागण्यासंदर्भात दि.२०.१०.२०२१ रोजी मा.उपमुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत सविस्तर चर्चा होऊन शक्य त्या अडचणींचे निराकरण करण्याची भूमिका स्विकारण्यात आली.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील आयुर्वेदीक कंपन्यांनी आयुर्वेदाच्या नावाखाली अल्कोहोल मिश्रीत सॅनिटायझरची निर्मिती केल्याबाबत

**(२८) १२८२४ (१४-०९-२०२०). श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आयुर्वेदीक कंपन्यांनी जादा नफा मिळविण्याच्या दृष्टीने आयुर्वेदाच्या नावाखाली अल्कोहोल मिश्रीत सॅनिटायझरची निर्मिती करतांना त्यात कडुनिंब आणि तुळस या महत्वाच्या घटकांचा वापर न करता तसेच अन्न व औषध प्रशासनाच्या नियमांविरुध्द आयुर्वेदाच्या नावाखाली रासायनिक घटकांचा अवलंब करीत असल्याचे दिनांक १८ मे, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अल्कोहोलयुक्त सॅनिटायझर बनविण्यास विरोध असलेल्या आयुर्वेदिक कंपन्यांना अल्कोहोलचे प्रमाण किती असावे याबाबत आयुष मंत्रालयाने निश्चित अथवा स्पष्ट केले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अल्कोहोलच्या वापराचे प्रमाण निश्चित / स्पष्ट न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, आयुर्वेद वापरामध्ये अल्कोहोल व इतर आवश्यक घटकांचे प्रमाण निश्चित करण्यासाठी शासनाने आयुष मंत्रालयाकडे पाठपुरावा करुन कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार अल्कोहोल मिश्रीत सॅनिटायझरची निर्मिती करणाऱ्या कंपन्यांची चौकशी करुन त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. राजेंद्र शिंगणे (०७-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे. आयुष मंत्रालय, केंद्रशासन, नवी दिल्ली यांनी त्यांच्या दि. ०२.०४.२०२० च्या पत्रामध्ये अल्कोहोलयुक्त सॅनिटायझर मध्ये अल्कोहोलचे प्रमाण किती असावे याबाबत काहीही निश्चीत केलेले नाही.

(३) सदर प्रश्न आयुष मंत्रालय, केंद्रशासन, नवी दिल्ली यांच्या अखत्यारीतील आहे.

(४) व (५) सॅनिटायझरमध्ये साधारणपणे ६०% पेक्षा जास्त अल्कोहोल असलेले सॅनिटायझर हे कोरोना सारख्या विषाणूंना मारण्याकरिता पुरेसे असल्याबाबत सिध्द झालेले असल्याने आणि त्यानुसार राज्यात ६०% पेक्षा जास्त अल्कोहोल असलेले सॅनिटायझर आयुर्वेदिक ग्रंथोक्त घटक द्रव्यासहीत तयार करण्यात आल्याने त्यांची चौकशी करून कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. तसेच आयुष मंत्रालय, केंद्रशासन यांनी त्यांच्या दि. ०२.०४.२०२० च्या पत्रान्वये आयुष परवाना प्राधिकारी यांनी अशा आयुर्वेदिक उत्पादनांना औषधे व सौंदर्य प्रसाधने कायद्यातील तरतूदींच्या अधीन राहून परवाने व उत्पादन पाठांच्या प्रस्तावांना त्वरीत मंजूरी देण्याबाबत सूचना दिल्या असल्याने आणि त्यानुसार अन्न व औषध प्रशासनाने सॅनिटायझरच्या उत्पादकांना विधीवत मंजूरी दिली असल्याने कोणतीही कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

## नागपूर येथून नागपूर-अमरावती मेट्रो लाईन सुरू करण्याबाबत

**(२९) १३०२४ (१९-०९-२०२०). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भाचा विकास होण्याच्या दृष्टीने नागपूर औद्योगीक व महाराष्ट्राची उपराजधानी असलेले संत्रा नगरी म्हणून प्रसिध्द असलेले शहर असून या शहरात मोठ्या प्रमाणात मेट्रोचे जाळे गुंफले गेलेले असून नागपूर- अमरावती मेट्रो लाईन सूरू करण्याची मागणी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर - अमरावती मेट्रो लाईन सुरू केल्यास वर्धा जिल्ह्यातील कारंजा येथील औद्योगीक क्षेत्र, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे समाधी स्थान मोझरी, नांदगांव पेठ येथी ५ स्टार एम.आय.डी.सी., रहाटगांव येथील बिझीलॅन्ड मार्केट हे जोडले जाणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपूर-अमरावती ही मेट्रो लाईन टाकण्यासाठी कोणत्याही प्रकारची खाजगी जमीन संपादीत करण्याची आवश्यकता नसून राष्ट्रीय महामार्ग ६ हा मुख्य मार्ग नागपूर-अमरावती शहराला जोडला असल्यामुळे याच मार्गावरील जागा मेट्रो लाईन उभारण्याकरिता उपलब्ध होऊ शकते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच त्याचे थोडक्यात स्वरूप काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-१२-२०२१) :** (१) सदर बाबतीत मागणी केल्याची दिसून येत नाही.

(२), (३), (४), (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई येथील गृहनिर्माण संस्थेतील सायन चुनाभट्टी रहिवाश्यांनी नोंदणीकृत गृहनिर्माण संस्थेच्या पत्रावर स्वाक्षऱ्या केल्याबाबत

**(३०) १३५६९ (२०-०९-२०२०). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सायन चुनाभट्टी, मुंबई उपनगरातील हिल रोड परिसरातील अनेक भूखंडांवर आणि विशेषतः कुर्ला-३ (ता. कुर्ला) अंतर्गत न.भू. क्र.२९५ व ३७३ वर असलेल्या सायन चुनाभट्टी श्री गुरुदत्त कृपा सहकारी गृहनिर्माण संस्था आणि चुनाभट्टी श्रमिक सहकारी गृहनिर्माण संस्था या म्हाडा नोंदणीकृत २ गृहनिर्माण संस्थांचे विधिवत सदस्य नसलेल्या रहिवाश्यांनी नोंदणीकृत गृहनिर्माण संस्थेच्या दिनांक २२ मार्च, २०१४ रोजीच्या पत्रावर संस्थेचे पदाधिकारी म्हणून स्वाक्षऱ्या करून किंग्ज बिल्डर्स अँड डेव्हलपर्स, चेंबूर, मुंबई या विकासकाची नेमणूक करून बृहन्मुंबई महानगरपालिकेस पत्रव्यवहार केल्याबाबतची कागदपत्रे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास सादर केली असल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त दोन्ही नोंदणीकृत सहकारी संस्थांचे एकत्रीकरण करण्यापूर्वी त्यांच्या स्वतंत्र विशेष सर्वसाधारण सभा आयोजित करून त्यास त्यांची पूर्वानुमती घेण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, घरांचे मालकही नसलेल्या रहिवाश्यांनी उपजिल्हाधिकारी, मुलुंड यांना सादर केलेल्या घोषणापत्रावर संस्था पदाधिकारी म्हणून स्वाक्षऱ्या करणे, आचारसंहिता काळात सर्वेक्षण नोटिसा लावून ते पूर्ण करणे व तयार प्रारूप परिशिष्ट-२ बाबत लेखी आक्षेप नोंदवूनही त्याची दखल न घेणे या प्रकरणी चुनाभट्टी श्रमिक गृहनिर्माण संस्थेच्या सदस्यांनी म्हाडा मंडळ व झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकारण यांना दिनांक ६ जून, २०१९ ते दिनांक ९ जानेवारी, २०२० या कालावधीत तसेच उपजिल्हाधिकारी (अतिक्रमण/निष्कासन ) तथा प्राधिकृत अधिकारी, मुलुंड यांच्याकडे दिनांक ३० जुलै, २०१९ ते दिनांक १४ जानेवारी, २०२० अनेक तक्रारी करूनही त्यांनी त्यांची पोच देण्याव्यतिरिक्त अन्य कोणतीही कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यात कोरोना फैलावा मुळे सर्व शासकीय कार्यालये बंद असतानाही उपजिल्हाधिकारी, मुलुंड यांनी युद्धपातळीवर अंतिम परिशिष्ट-२ तयार केले असून अद्याप ते अपूर्ण आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, बेकायदेशीररित्या झालेली विकासकाची नियुक्ती रद्द करून ती करणारे संस्थेचे रहिवासी व त्यास मान्यता देणारे म्हाडा व पुनर्वसन प्राधिकरणाचे अधिकारी व कर्मचारी तसेच जिल्हाधिकारी व उपजिल्हाधिकारी यांची चौकशी करून त्यांच्यावर आवश्यक कारवाई करून तेथील सदस्य व रहिवासी यांना दिलासा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (१३-१२-२०२१) :** (१) हे खरे आहे.
न.भू.क्र. २९५ व न.भू.क्र.३७३ कुर्ला गांव, हिल रोड, सायन चुनाभट्टी (पूर्व) या नावे योजना मे.किंग्स बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास दि.२०.०६.२०१६ रोजी सादर केलेली सदर योजना दि.०४.०४.२०१९ रोजी स्वीकृत करण्यात आली आहे.
(२) श्री.गुरुदत्त कृपा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. आणि चुनाभट्टी श्रमिक सहकारी संस्था मर्या. या दोन्ही संस्था उपनिबंधक सहकारी संस्था, म्हाडा, मुंबई शहर व पूर्व उपनगरे यांच्याकडे नोंदणीकृत असून या मुद्दयाच्या अनुषंगाने त्यांनी दि.२४.०७.२०२० रोजी लेखी कळविलेले आहे. त्यामध्ये नमूद केले आहे की, उपरोक्त दोन्ही संस्था त्यांच्या कार्यालयात नोंदणीकृत असून या दोन्ही संस्थांच्या एकत्रीकरणाबाबत कोणतीही कार्यवाही त्यांनी प्रस्तावित केलेली नाही, अथवा तशी पूर्व परवानगी दिलेली नाही.
(३) हे खरे नाही.
तक्रारदार श्री. सुभाष गंगाराम पवार व इतर ७ तसेच श्री.चंद्रकांत अमृत भोसले व इतर ५ यांच्या तक्रार अर्जावर उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) तथा सक्षम प्राधिकारी, कुर्ला-२ यांचे पत्र दि.१६.१२.२०१९ जा.क्र.६५ व दि.२६.०५.२०२० जा.क्र. ५०८,५०९ अन्वये संबंधित तक्रारदारांना लेखी कळविण्यात आले आहे.
(४) हे खरे नाही.
उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) तथा सक्षम प्राधिकारी कुर्ला-२ यांनी विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन दि.२८.०५.२०२० रोजी परिशिष्ट-२ तयार केले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत मंजुर प्रकल्पांना देय असलेला निधी उपलब्ध करून देण्याबाबत

**(३१) १४३४२ (२०-०९-२०२०). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत मंजुर प्रकल्पांना देय असलेला निधी उपलब्ध करून देण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १४ जुलै, २०२० रोजी वा त्यासुमारास प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग यांना लेखी निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने मंजुर प्रकल्पांना देय असलेला निधी उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (०८-१२-२०२१) :** (१) होय.
(२) प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत ऑटोरिक्षा चालक / मालकांना घरे उपलब्ध करुन देण्याकरिता महाराष्ट्र निवारा निधीतून १०० सदनिकेकरिता महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) कडून रुपये २.७२ कोटी एवढा निधी नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांच्या खात्यात जमा करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आरे मेट्रो कारशेडचे बांधकाम सुरू करण्याबाबत

**(३२) १४३९१ (१७-०८-२०२०). श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आरे मेट्रो कारशेडच्या कामासंदर्भात सर्वोच्च न्यायालय तसेच हरित लवादाकडून परवानगी मिळूनही केवळ शासनाने परवानगी न दिल्यामुळे कारशेडचे काम सुरू होऊ शकले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाकडून परवानगी प्राप्त न झाल्याने कारशेडचे काम ठप्प झाले असून या प्रकल्पावर प्रतिदिन सुमारे पाच कोटी रुपयांचा भुर्दंड सोसावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाकडून परवानगी प्राप्त न झाल्याने सदर प्रकल्प सन २०२१ पर्यंत पूर्ण होऊ शकणार नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकल्पाचे काम लवकारात लवकर सुरू करण्याचे आदेश तातडीने देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-१२-२०२१)** :(१) अंशत: खरे आहे. शासनाने माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये मुंबई मेट्रो लाईन-३ प्रकल्पाच्या आरे येथील कारशेडसाठी निश्चित केलेल्या जागेवर वृक्ष तोडणीस व त्यानुषंगाने इतर कोणतीही कार्यवाही करणेस स्थगिती दिली होती. तद्नंतर, माहे डिसेंबर २०२० मध्ये तत्कालिन मा. मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या नऊ सदस्यीय समितीने तांत्रिक, वित्तीय व पर्यवरणविषयक बाबींचा सविस्तर विचारात घेऊन परिचालन विषयक सुसाध्यता व खर्चात होणाऱ्या बचतीच्या दृष्टीने मुंबई मेट्रो -३, ४ व ४अ आणि ६ या मार्गिकेच्या एकात्मिक डेपोसाठी कांजुरमार्ग येथील जागा उपलब्ध करुन देण्याची तसेच मुंबई मेट्रो-३ मार्गिकेसाठी आरे येथे १६ स्टॅबलिंग लाईन्ससाठी जागा उपलब्ध करुन देण्याची शिफारस केली होती. सदरच्या शासनाने शिफारसी स्विकारल्या असून त्यानुषंगाने कार्यवाही करण्याबाबत संबंधित अंमलबजावणी यंत्रणांना निर्देश दिले आहेत. दरम्यानच्या कालावधीत कांजूरमार्ग येथील जागेच्या मालकी हक्काची बाब न्यायप्रविष्ठ झाली आहे. यामध्ये मा.मुंबई उच्च न्यायालयाने जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचेकडून कांजुरमार्ग येथील जागेबाबत देण्यात आलेल्या आगाऊ ताबा आदेशाला स्थगिती दिली आहे.

(२), (३), (४), व (५) एकात्मिक कारडेपोची तांत्रिक व्यवहार्यता व त्यामुळे होणारे फायदे व खर्चात होणारी बचत विचारात घेऊन मुंबई मेट्रो लाईन-३, ४ व ४ अ आणि ६ या प्रकल्पांसाठी कांजूरमार्ग येथे एकात्मिक डेपो उभारण्याचे निश्चित करण्यात आले आहे. कारडेपोची जागा उपलब्ध होण्यास विलंब झाल्यास प्रकल्प खर्चात वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदरचा प्रकल्प जलद गतीने पुर्णत्वास नेण्याबाबत शासन सर्वोतोपरी प्रयत्नशील आहे.

---

**मुंबईतील वांदे-कुर्ला कॉम्प्लेक्स़ येथे मुंबई महानगर प्रदेश विकास प्रधिकारणने विना निविदा कोव्हीड सेंटर उभारण्याचे काम दिले असल्याबाबत**

**(३३) १४४५८ (२०-०९-२०२०). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वांदे-कुर्ला कॉम्प्लेक्स़ येथे (एमएमआरडीएने) विना निविदा ज्यादा किंमतीमध्ये “कोव्हीड सेंटर” उभारण्याचे काम दिले असल्याचे माहे जुलै, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निविदा न मागविता रु. ४० कोटीपेक्षा जास्तीचे काम दिले असून यामध्ये रु. २२ कोटीचा खर्च तात्पुरता शेड उभारण्याकरिता झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनीं मा. लोकआयुक्त यांच्याकडे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानूसार चौकशीअंती दोषी असणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-१२-२०२१) :** (१) व (२) हे खरे नाही,

वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स येथील कोविड सेंटर उभारणीकरीता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या शासन निर्णय, दिनांक १ डिसेंबर, २०१६ व केंद्र शासनाच्या अर्थ विभागाच्या मॅन्युअल ऑप प्रॉक्युरमेंट ऑफ गुडस्, २०१७ मधील संबंधित तरतूदीनुसार खरेदी प्रक्रीया राबविण्यात आली आहे.

सदर कोव्हिड हॉस्पिटल टप्पा १ च्या तात्पुरत्या शेडकरीता रु. १२.७८ कोटी व समर्पित कोव्हिड हॉस्पिटल टप्पा २ च्या तात्पुरत्या शेडकरीता रु. २०.५८ कोटी इतका खर्च झालेला आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही

---

**राज्यातील विभागीय माहिती आयुक्यांताची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(३४) २०३५५ (१८-०१-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रातील सात महसूल विभागासाठी माहिती अधिकार कायद्याच्या अंमलबजावणी करिता माहिती आयुक्त पदांची नेमणूक करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील अडीच वर्षापासून तीन विभागीय माहिती आयुक्तांची पदे रिक्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील निवृत्त मुख्य न्यायमूर्तीच्या समितीने माहिती आयुक्तांच्या नावाची शिफारस मा. मुख्यमंत्री यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील रिक्त असलेल्या माहिती आयुक्तांच्या पदामुळे जवळपास हजारो प्रकरणे प्रलंबित असल्याची माहिती निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, कार्यकाल संपून अडीच वर्षे झालेल्या अधिकाऱ्यांमार्फत सुनवण्या घेणे व प्रकरणे निकाली काढणे या पद्धतीचे कामे नियमबाह्य केली जात आहेत, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, नियमानुसार रिक्त पदे होण्याच्या तीन महिने आधी नव्या आयुक्ताची निवड प्रक्रिया सुरु करणे बंधनकारक असतानाही राज्यातील तीन विभागीय आयुक्त पदे रिक्त झालेबाबत संबंधित दोषींवर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे तसेच राज्यातील रिक्त विभागीय आयुक्तांची पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उद्धव ठाकरे (०८-१२-२०२१) :** (१) होय, खरे आहे.

माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १५ अन्वये महाराष्ट्र राज्य माहिती आयोगासाठी राज्य मुख्य माहिती आयुक्तांचे एक पद व राज्य माहिती आयुक्तांची ७ पदे (बृहन्मुंबई, कोकण, पुणे, नाशिक, अमरावती, औरंगाबाद, नागपूर) अशी एकूण ८ माहिती आयुक्तांची पदे निर्माण केली आहेत.

(२) होय, खरे आहे.

राज्य माहिती आयुक्त, पुणे, नाशिक व नागपूर ही ३ पदे अनुक्रमे दि.०३.११.२०१८, दि.२१.०२.२०१९ व दि.०१.०६.२०१८ पासून रिक्त आहेत.

(३) होय, खरे आहे.

• मा. सर्वोच्च न्यायालयात, श्रीमती अंजली भारद्वाज व इतर यांनी केंद्र शासना विरुध्द दाखल केलेल्या रिट याचिका (सिव्हील) क्र. ४३६/२०१८ प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १३.१२.२०१८ रोजी दिलेल्या अंतरिम आदेशाच्या अनुपालनाकरिता राज्य मुख्य माहिती आयुक्त/राज्य माहिती आयुक्त पदावरील नियुक्तीसाठी महाराष्ट्र राज्यातील नियुक्ती समितीस सहाय्य करण्यासाठी, शासन निर्णय, दिनांक २२ फेब्रुवारी, २०१९ अन्वये शोध समिती (Search Committee) स्थापन केली आहे.

• सदर शोध समितीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार, राज्य माहिती आयुक्त यांची ३ रिक्त पदे भरण्याकरिता दिनांक ७ जून, २०१९ रोजी वर्तमानपत्रात व शासनाच्या संकेतस्थळावर यासाठीची तपशीलवार जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदर जाहिरातीस अनुसरुन अर्ज प्राप्त झाले होते.

• त्यानंतर केंद्र शासनाने दिनांक २४.१०.२०१९ च्या अधिसूचनेन्वये राज्य मुख्य माहिती आयुक्त/ राज्य माहिती आयुक्त यांच्या वेतन, भत्ते, पदावधी व अन्य सेवाशर्तीमध्ये बदल केला आहे. सेवाशर्ती मधील सदर बदल संबंधित अर्जदारांच्या निदर्शनास आणण्यासाठी व राज्य माहिती आयुक्त पदासाठी अर्ज व इच्छूकता कायम ठेवण्याबाबत वर्तमानपत्रात व शासनाच्या संकेतस्थळावर दिनांक २०.०२.२०२० रोजी जाहिरात देण्यात आली होती.

• त्यानंतर व्हिडीओ कॉन्फरन्स द्वारे दिनांक ५.८.२०२०, दिनांक ४.९.२०२० व दिनांक ११.९.२०२० रोजी शोध समितीच्या बैठका झाल्या आहेत.

(४) होय. खरे आहे.

राज्य माहिती आयोग, मुख्यालय व अन्य खंडपीठाकडे डिसेंबर, २०२० अखेर ५३०५९ इतकी द्वितीय अपीले प्रलंबित आहेत.

(५) हे खरे नाही.

(६) माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत कलम १५(३) मधील तरतुदीनुसार, मा.राज्यपालांना राज्य मुख्य माहिती आयुक्त आणि राज्य माहिती आयुक्त नेमण्याची शिफारस करण्यासाठी, शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक ५ ऑक्टोबर, २०२० अन्वये, मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे त्रिसदस्यीय समिती गठीत केली आहे.

१. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य ... अध्यक्ष;

२. विरोधी पक्ष नेता, विधान सभा, महाराष्ट्र राज्य ... सदस्य;

३. उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य ... सदस्य.

उपरोक्त समितीच्या शिफारशीनंतर मा. राज्यपाल महोदयांच्या मान्यतेनंतर राज्य माहिती आयुक्तांची नियुक्ती करण्यात येते.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील मरोळ गाव येथील CTS क्रमांक १०५४ या भूखंडावर अनधिकृत बांधकाम केल्याबाबत**

**(३५) २०३७३ (११-१०-२०२१). ॲड.राहुल नार्वेकर (कुलाबा) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मरोळ गाव येथील CTS क्रमांक १०५४ या भूखंडावर अनधिकृत बांधकाम करण्यात आल्याची बाब माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी वा पाहणी केली आहे काय, असल्यास चौकशीच्या अनुषंगाने अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-१२-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) सदर ठिकाणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दिनांक २२.०३.२०२१ रोजी प्रत्यक्ष स्थळपाहणी केली असता तळमजल्याचे एक चालू बांधकाम आढळून आले.

सदर बांधकामास मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३५४ (ए) अन्वये काम थांबविण्याकरिता दिनांक २५.०३.२०२१ रोजी नोटीस देण्यात आली.

तद्नंतर सदर नोटीसमधील कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर दिनांक १२.०५.२०२१ रोजी सदर बांधकाम बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत निष्कासित करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**येरवडा (जि.पुणे) येथील फारुख वाडिया फायनल प्लॉट क्रमांक ३/३ या जागेवरील मेट्रो स्टेशन अनधिकृतरित्या स्थलांतरित केल्याबाबत.**

**(३६) २७१९७ (१२-०६-२०२१). श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येरवडा (जि.पुणे) येथील फारुख वाडिया फायनल प्लॉट क्रमांक ३/३ या जागेवरील मेट्रो स्टेशनचे आरक्षण खासगी विकासकाला फायदा मिळवून देण्याकरीता स्थलांतरीत करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी मेट्रो स्टेशन स्थलांतरीत करण्याबाबतची कारणे काय आहेत तसेच स्थलांतरीत करण्याबाबतची मागणी कोणी केली होती,

(३) असल्यास, सदर आरक्षण स्थलांतरीत करण्याबाबत पुणे महानगरपालिकेने कायदेशीर कार्यवाही पुर्ण केली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-१२-२०२१) :**(१) हे खरे नाही.

सदर आरक्षण स्थलांतरीत करण्याकरीता पुणे महानगरपालिकेचा प्रस्ताव महामेट्रोकडून यथास्थित (Status quo) ठेवण्यास दि. १२.११.२०२० च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विविध प्रादेशिक मंडळांमार्फत रु. १ कोटीपेक्षा जास्त रकमेच्या कामांना शासनाची पूर्व मान्यता घेणे बंधनकारक करणारे परिपत्रक रद्द करण्याबाबत**

**(३७) २७३१८ (१२-०६-२०२१). श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाडा प्राधिकरण व त्याअंतर्गत असलेल्या विविध प्रादेशिक मंडळांमार्फत रुपये १ कोटीपेक्षा जास्त रकमेच्या कामांना शासनाची पूर्व परवानगी घेण्यासंबंधीचे परिपत्रक गृहनिर्माण विभागाने दिनांक १६ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास निर्गमित केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, म्हाडा ही संस्था सर्वसामान्यांकरिता स्वस्त घरे उपलब्ध करून देण्यासाठी कार्यरत असताना प्रशासकीय कामात दिरंगाई होऊ नये म्हणून अधिकारांचे विकेंद्रीकरण करणे आवश्यक असताना अधिकारांचे केंद्रीकरण करण्यामागची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, परिपत्रकामध्ये नमूद केलेली कारणे प्रशासकीय अथवा तांत्रिक मान्यता न घेणे, अनियमितता असणे ही विचारात घेतली तरी अशा अपवादात्मक प्रकरणांमध्ये कारवाई करण्याचा पर्याय विभागाकडे खुला असताना रुपये १ कोटीपेक्षा अधिक असलेल्या निविदा मान्यतेसाठी शासनाकडे घेण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू परिपत्रक रद्द करून पूर्वीची व्यवस्था कायम ठेवण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (०९-१२-२०२१) :** (१), (२), (३), व (४), म्हाडाच्या स्तरावर विविध कामाबाबत निविदा काढल्या जातात. त्यासाठी प्रत्येक स्तरावरील अधिकाऱ्यांना निविदा काढण्याबाबत वित्तीय अधिकार देण्यात आलेले आहेत. तथापि प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मान्यता तसेच इतर अनुषंगिक मान्यता न घेतासुध्दा मोठ्या रकमेच्या निविदा प्रसिध्द केले असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. अशा प्रकरणी न्यायालयीन प्रकरणेसुध्दा उद्भवलेली आहेत.

अशा प्रकारच्या निविदेवर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीकोनातून शासनाची पूर्व मंजूरी घेणे आवश्यक असल्याने म्हाडा प्राधिकरण व त्याअंतर्गत असलेल्या विविध प्रादेशिक मंडळामार्फत रु. १ कोटीपेक्षा जास्त रकमेच्या कामांना शासनाची पूर्वपरवानगी घेण्यासंबंधी दि.१६/०३/२०२१ रोजीचे शासन परिपत्रक निर्गमित करण्यात आले आहे. तद्नंतर रु. १० कोटीपेक्षा जास्त रकमेच्या कामांना शासनाची पूर्वपरवानगी घेण्यासंबंधी दि. २९/०६/२०२१ रोजी शासन शुध्दीपत्रक निर्गमित करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**म्हाडा इमारतीतील सदनिका विकत घेतलेल्या नागरिकांना मालकी हक्क देण्याबाबत**

**(३८) २७३४२ (१२-०६-२०२१). श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील म्हाडा सदनिका विकत घेतलेल्या नागरीकांना त्यांचा मालकी हक्क नाकारण्यात येत असल्याची बाब माहे मार्च २०२१ रोजी वा दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अभिहस्तांतरण झालेल्या इमारतीच्या प्रकल्पात म्हाडाला सहभागी होता येत नसल्यामुळे म्हाडाकडून त्रिपक्षी करारनामा करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, म्हाडा इमारतींना मालकी हक्क (कन्व्हेयन्स) द्यायचा नाही असा निर्णय शासनाने घेतल्यामुळे रहिवाश्यांमध्ये नाराजी पसरल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने घेतल्या निर्णयाचा फेरविचार करून म्हाडाने इमारतीतील सदनिका विकत घेतलेल्या नागरिकांना मालकी हक्क देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (१३-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) म्हाडा वसाहतीतील इमारतींचा पुनर्विकाससंदर्भात केवळ संबंधित गृहनिर्माण संस्था व विकासक यांच्यामध्ये द्विपक्षीय करार झालेले असल्याने त्यामधील अटी व शर्तींचे उल्लंघन झाल्यास म्हाडाकडून कोणताही हस्तक्षेप करता येत नाही. परिणामी असे पुनर्विकास प्रकल्प वर्षानुवर्षे रखडतात. तसेच संबंधित रहिवाश्यांच्या भाड्यासंदर्भातील तसेच अन्य तक्रारींचे निवारणही योग्य रीतीने होत नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आल्याने दि.१६.०३.२०२१ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये म्हाडाअंतर्गत वसाहतीमधील इमारतींच्या पुनर्विकासासाठी म्हाडा, संबंधित गृहनिर्माण संस्था व विकासक यांच्यामध्ये त्रिपक्षीय करार करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

(३) असा निर्णय घेतलेला नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोरेगाव पूर्व (मुंबई) परिसरातील गोकुळधाम येथे केनवूड कन्स्ट्रकशन या विकासकाने नियमबाह्यरित्या आराखडयात केलेला बदल**

**(३९) २८०४६ (१२-०६-२०२१). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरेगाव (मुंबई) येथील नागरी कमाल जमीन धारणा कायद्यांतर्गत संपादित केलेल्या भूखंडांपैकी जवळपास ३३,००० चौ.मी. इतकी जागा राष्ट्रीय मिल मजदूर संघाला शासनाकडून देण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू जागेवर राष्ट्रीय मिल मजदूर संघातील कामगारांना विविध ३ योजनेंतर्गत घरे व आरक्षित सुविधा पूर्ण करून हस्तांतरित करणेसाठी विकासक केनवूड कन्स्ट्रकशन या विकासकाची नियुक्ती करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू विकासकाने या ठिकाणी कामगारांकरिता घरे बांधताना कामगारांना शाळा, मैदान, तरण तलाव यांसारख्या इतर महत्त्वाच्या नागरी सुविधा उपलब्ध करून न देता या जागेचा विकास करताना केलेल्या करारनाम्यात कामगारांची फसवणूक करून आराखडयात नियमबाह्यरित्या बदल करून शासनाकडून मिळालेल्या जमिनीचा व बांधकाम परवानगीचा स्वत:च्या फायद्यासाठी वापर केला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विकासकाने या योजनेतील सदनिकाधारकांसाठी तरण तलाव सुविधांसाठी राखीव असलेल्या जागेत गोकुळधाम मेडिकल सेंटरची इमारत उभारुन तळमजल्याखालील तळघरात (बेसमेंट) अनधिकृत अनिवाशी गाळे बांधून कोणतीही सुरक्षितता न ठेवता त्याचे व्यावसायीकरण केले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच नागरी कमाल जमीन धारणा कायद्यांतर्गत मिळालेल्या भूखंडापैकी काही भूखंडावर कामगारांकरिता सदनिका बांधून उर्वरीत मोकळया जागेच्या चटई क्षेत्र निर्देशांकाचा विकासक मे.केनवूड कन्स्ट्रकशन यांनी स्वत:च्या आर्थिक फायद्याकरिता बेकायदेशीररित्या वापर केला, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी तथा तपासणी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे व त्या अनुषंगाने शासनाची दिशाभूल करणाऱ्या तसेच लाभ धारकाना त्यांच्या हक्काच्या आरक्षित सुविधां पासून वंचित ठेवणा-या विकासकाविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-१२-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.

बृहन्मुंबई नागरी समुहातील मौजे दिंडोशी, चिंचोली येथील मंजूर गुहबांधणी योजनेतील ३३,०१५.८१ चौ.मी. इतके बांधीव क्षेत्र असलेल्या १००० सदनिका राष्ट्रीय मिल मजदूर संघास देण्यात आलेल्या आहेत. राष्ट्रीय मिल मजदूर संघाला कोणतीही जागा देण्यात आलेली नाही.

(२) होय हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

सदर प्रकरणी विकासकास शासनाकडून कोणतीही जमीन मिळालेली नसून नागरी कमाल जमीन धारणा व विनियमन अधिनियमन अधिनियम, १९७६ अन्वये १०% सदनिका ह्या शासनाने नामनिर्देशित केलेल्या व्यक्तिंना विकण्याची अट होती त्या अनुषंगाने शासनाने नामनिर्देशित केल्याप्रमाणे राष्ट्रीय मिल मजदूर संघाच्या कर्मचाऱ्यांसाठी मुबलक दरात १००० सदनिका या प्रत्यार्पित केलेले आहे.

(४) अंशत: खरे आहे.

गोकूळ धाम अभिन्यासामध्ये तरण तलाव सुविधांसाठी कोणतीही जागा राखीव नसून गोकूळधाम माध्यमिक शाळेच्या लगत असलेल्या जागेत विकास नियंत्रण नियमावलीच्या तरतुदीप्रमाणे तरण तलाव बांधण्यात आलेला आहे.

गोकुळधाम मेडीकल सेंटर येथील तळघराची पाहणी करुन होत असलेल्या अनधिकृत वापराबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ५३ (१) अन्वये नोटीस बजावण्यात आलेली आहे. त्यानुसार सदर ठिकाणचा अनधिकृत व्यावसायिक वापर बंद करण्यात आलेला आहे.

(५) नाही, हे खरे नाही.

सदर गोकूळधाम अभिन्यासामध्ये सर्व परवानग्या ह्या विकास नियंत्रण नियमावली व तत्कालीन धोरणांच्या अनुषंगाने देण्यात आलेल्या आहेत.

(६) व (७) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्हयातील प्रत्येक तालुक्यात आरटीपीसीआर प्रयोगशाळा सुरू करण्याबाबत**

**(४०) २९६७७ (१३-०७-२०२१). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयामध्ये कोरोना रुग्ण संख्या व कोरोनामुळे होणारे मृत्यू संख्या याबाबतची जिल्हयात जाहीर होणारी आणि शासनाला पुरविली जाणारी माहिती यामध्ये तफावत असल्याचे निदर्शनास आले असल्याने याबाबत अचूक माहिती देण्याची मागणी तसेच चुकीची माहिती देणाऱ्यावर कारवाई करून माहिती आद्ययावत करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २३ एप्रिल २०२१ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, बुलडाणा यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, जिल्हयामध्ये कोरोना संसर्गाच्या रुग्णसंख्येत वाढ होत असून येथे कोरोना चाचणी करण्यासाठी दोनच शासकीय प्रयोगशाळा असल्याने तातडीने कोरोना चाचणीचा अहवाल मिळण्यास विलंब होत असल्याने जिल्हयातील प्रत्येक तालुक्यात आरटीपीसीआर प्रयोगशाळा सुरू करावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १५ मे २०२१ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी,बुलढाणा यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (१३-१२-२०२१) :** (१) हे अंशतः खरे आहे,

जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयाकडून कोवीड वॉर रुम येथील कंत्राटी डाटा एंट्री ऑपरेटर यांचेकडून पॉझिटिव्ह रुग्णांच्या नोंदी व कोविड मृत्यूंची नोंद कोविड पोर्टलवर करण्यात येते. प्रयोगशाळा संदर्भातील माहिती आय.सी.एम.आ.पोर्टल (सी.व्ही.ॲनालिटिक्स) वरुन तर डिस्चार्ज, मृत्यू संदर्भातील माहिती कोविड-१९ पोर्टलवरुन राज्यस्तरावर घेतली जाते. दि.२३ एप्रिल, २०२१ वा त्या सुमारास कोविड दैनिक रुग्णसंख्या मोठ्या प्रमाणात असल्यामुळे तसेच या दोन्ही पोर्टलवरील काही तांत्रिक अडचणीमुळे कोविड संदर्भातील आकडेवारीमध्ये काही तफावत आढळली हे खरे आहे.

कोविड पोर्टलवरील रुग्ण व मृत्यू नोंद याबाबत जिल्हयात जाहीर केली जाणारी आकडेवारी यामध्ये तफावत आढळल्याने संबंधित डाटा एंट्री ऑपरेटर यांना ओव्हरटाईम करुन पोर्टलवर अद्ययावत रुग्ण नोंद घेणेबाबत सक्त ताकीद देण्यात आली. तसेच, पॉझिटव्ह रुग्णांच्या पोर्टलवरील डेटा एंट्री नियमित करण्यात आली असून आकडेवारीतील तफावत दूर करण्यात आलेली आहे.

(२) हे खरे आहे.
(३) जिल्ह्यामध्ये २ आरटीपीसीआर प्रयोगशाळा असल्या तरी तालुक्यास्तरावर रॅपिड ॲन्टीजन चाचणीची सुविधा उपलब्ध करण्यात आल्याने ही अडचण दूर झाली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### बेडगाव (ता.कोरची, जि.गडचिरोली) वन परिक्षेत्रा अंतर्गत झनकार गोंदी व टेमली हद्दीतील बांबुची होत असलेली तस्करी

**(४१) ३०६७१ (१८-०६-२०२१). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बेडगाव (ता.कोरची, जि.गडचिरोली) वन परिक्षेत्रांतर्गत झनकार गोंदी व टेमली हद्दीतील अंदाजे २ कोटी ४० लक्ष रुपयाच्या किंमतीचे १७ लक्ष लांब बांबु व बंडल कंत्राटदार व संबधीत अधिकाऱ्यांनी ग्रामसभेला विश्वासात न घेता परस्पर विकल्याचे माहे मे, २०२१ वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाचा महसूल बुडाला असल्याने चौकशीच्या अनुषंगाने महसुल वसुल करण्याबाबत तसेच संबंधीत कंत्राटदार व अधिकारी यांचेविरुद्ध कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उद्धव ठाकरे (०९-१२-२०२१) :** (१) व (२) कक्ष क्र.४५१, ४५८ व ४५९ पेसा अनुसूचित क्षेत्रात येत असल्याने गडेली ग्रामसभेनी ग्राम विकास विभाग शासन निर्णय दिनांक ३१.०३.२०१५ नुसार पेसा पर्याय-२ ची निवड करुन ३७७८४ लांब बांबू बंडल व १०६०० हॉफ बांबू बंडलचे निष्कासन केले आहे. सद्यस्थितीत बांबू गडेली ग्रामसभेच्या ताब्यात आहे. सदर बांबू विक्रीत कंत्राटदार व कोणत्याही अधिकाऱ्याचा काहीही संबंध नसून सदर बांबू गडेली ग्रामसभेने पेसा पर्याय-२ मधील तरतूदीनुसार विक्री केला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### अजिसपूर ते दे.साकर्शा (मेहकर, जि. बुलढाणा) पालखी मार्गाचे काम निकृष्ट झाल्याबाबत

**(४२) ३०८७१ (१८-०६-२०२१). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अजिसपूर ते दे.साकर्शा (मेहकर, जि. बुलढाणा) पालखी मार्गाचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याने यासंदर्भात संबधित कंत्राटदारांवर कारवाई करण्याची मागणी माहे जानेवारी, २०२१ रोजी च्या सुमारास स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा. सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) यांना लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खेर आहे काय,

(२) असल्यास, लोणार तालुक्यातून (जि.बुलढाणा) जाणारा शेगाव-पंढरपूर पालखी मार्गावर जागोजागी मोठ खड्डे पडले या रस्त्यालाही छोटे-मोठे अपघात होत असल्याचे निदर्शनास आले आहे तसेच जानेफळ (ता.मेहकर, जि.बुलढाणा) बायपास रस्त्याकडे दुर्लक्ष होत असल्याने या रस्त्यालाही खड्डे पडून अपघात होत असल्याचे माहे डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त निकृष्ठ दर्जाचे काम करणाऱ्या कंत्राटदारावर कारवाई करुन रस्त्याच्या दुरुस्तीकरिता शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे?

**श्री. अशोकराव चव्हाण (०९-१२-२०२१) :** (१) होय.

श्री.संजय रायमूलकर, वि.स.स.यांनी दि.२०.१०.२०२० व दि.०८.०६.२०२१ रोजीच्या पत्रान्वये सदर पालखी मार्गाचे काम निकृष्ट होत असल्याबाबत कळविले आहे.
(२) नाही.

सदर महामार्गाचे काम जवळपास पूर्ण झालेले असून रस्त्यावर खड्डे पडलेले नाहीत. पोलीस विभागाकडून प्राप्त माहितीनुसार रस्त्यावरील अपघात भरधाव वेगाने व चालकाच्या निष्काळजीपणामूळे झाल्याचे दिसून येते. जानेफळ बायपास हा रस्ता देऊळगाव साकर्शा-मेहकर राष्ट्रीय महामार्ग क्र.५४८ सी कि.मी. ३५/७८६ ते कि.मी.७१/७८६ या कामामध्ये अंतर्भुत नाही.
(३) सदर कामावर तांत्रिक सल्लागार (प्रकल्प अभियंता) मे.ध्रुव कन्सल्टंसी सर्व्हिसेस लि.यांची नेमणूक करण्यात आलेली असून त्यांच्या देखरेखीखाली कामाची नियमित तपासणी करण्यात येत असून प्रयोगशाळेत मानकानुसार वेळोवेळी आवश्यक त्या चाचण्या घेण्यात येतात. तसेच सक्षम प्राधिकारी यांच्याकडून वेळोवेळी कामाची तपासणी करण्यात येते. सदर रसत्याचे काम निकृष्ट दर्जाचे झालेले नसल्यामूळे कारवाई करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.
सद्य:स्थितीत रस्ता सुस्थितीत आहे
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात म्युकरमायकोसीस आजाराचे वाढते प्रमाण रोखण्यासाठी करावयाच्या उपाययोजना**

**(४३) ३२२१७ (०५-०८-२०२१). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कोरोना संसर्गजन्य आजारानंतर म्युकरमायकोसीस या आजाराच्या रुग्णांची संख्या ८० टक्क्यांनी वाढली असून मृतांच्या संख्येतही सुमारे ८३ टक्क्यांनी वाढ झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या आजाराचे सर्वाधिक रुग्ण नागपूर, पुणे, औरंगाबाद आणि मुंबई येथे असल्याचे दि. १६ जून, २०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय;
(३) असल्यास, राज्यात म्युकरमायकोसीस आजाराचा वाढता प्रादुर्भाव व मृत्यू संख्येतील वाढ रोखण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (१३-१२-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे,

राज्यात माहे जूलै, २०२१ अखेर एकूण कोविड रूग्णांच्या (६३०३७१५) संख्येपैकी म्युकरमायकोसिस आजाराची रूग्णसंख्या ९७०२ (०.२० टक्के) इतकी आहे. तसेच कोविडमुळे झालेल्या एकुण मृतांच्या (१३२७९१) संख्येपैकी म्युकरमायकोसिस मुळे झालेल्या मृतांची संख्या ११९५ (०.९० टक्के) आहे.

(२) होय हे खरे आहे,

राज्यात इतर जिल्हयांच्या तुलनेत माहे जुलै, २०२१ अखेर सर्वाधिक रूग्णांची नोंद नागपूर (१५३१), पुणे (१३०५), औरंगाबाद (१०९०), आणि मुंबई व उपनगरे (८५६) एवढी आहे.

(३) राज्यात म्युकरमायकोसिस प्रतिबंध व नियंत्रणासाठी पुढील उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

- राज्यातील सर्व जिल्हा/ महानगरपालिकांना म्युकरमायकोसिस चे रूग्ण हाताळण्या संबंधित मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या आहेत.
- शासन निर्णय क्र. मफुयो-२०२१/प्र.क्र. १०३/आ-६ दिनांक१८ मे, २०२१ नुसार म्यूकरमायकोसिस आजारावर महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजने अंतर्गत मोफत उपचार करण्यास मान्यता प्रदान केली आहे.
- राज्यांमध्ये म्युकमायकोसिस उपचार देणारी एकुण ५९२ रूग्णालये असून, त्यापैकी १३१ रूग्णालयांमध्ये महात्मा फुले जन आरोग्य योजने अंतर्गत रूग्णांना पुर्णत: मोफत उपचार केले जात आहेत.
- राज्याने केंद्रीय आरोग्य मंत्रालयाच्या सूचनेन्वये म्युकमायकोसिस या आजाराला "साथरोग कायदा - १८९७ "अंतर्गत दि. २५ मे, २०२१ रोजी अधिसूचित केलेले आहे.
- सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत शासकिय रूग्णालये, महाविद्यालय व रूग्णालय तसेच महापालिका रूग्णालयामध्ये उपचारार्थ दाखल असणाऱ्या रूग्णांना मोफत औषधे उपलब्ध करून देणेबाबत कळविले आहे.
- म्युकरमायकोसिस आजारावरील उपचारासाठी वापरण्यात येणारे Inj-Amphoterecin B ५० mg या औषधाची केंदशासनाकडून राज्यनिहाय / उत्पादकनिहाय संख्या निश्चित करून देण्यात येत आहे. राज्यस्तरावरून त्यानुसार उपलब्ध होणाऱ्या साठ्याची खरेदी करुन राज्यातील आरोग्य संस्थांच्या मागणी व उपलब्धतेनुसार पुरवठा केला जात आहे. राज्यातील प्रत्येक जिल्हयातील रूग्णसंख्येनुसार वाटप विभागीय आरोग्य उपसंचालक स्तरावर केले आहे. तेथून प्रत्येक विभागातील जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी व जिल्हा शल्यचिकित्सक यांनी रूग्णसंख्येनुसार औषधाचे वाटप केले आहे.
- सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत आरोग्य सेवा, आयुक्तालय, मुंबई यांचेस्तरावरून केंद्रशासनाने निर्धारित केलेल्या पुरवठादारकडून Inj-Amphoterecin B ५० mg च्या एकूण ५४८८९० एवढ्या व्हायल्स ची आजअखेर खरेदीप्रक्रिया राबविण्यात आली आहे.
- राज्यातील शासकिय आरोग्य संस्थांना राज्यस्तरावरून हे इंजेक्शन मोफत उपलब्ध करून देण्यात आले आहे, तसेच खाजगी रूग्णालयांसाठी देखिल साठा उपलब्ध करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील कंत्राटी वैदयकीय अधिका-यांना व आरोग्य कर्मचारी यांना कायमस्वरुपी सेवेत सामावून घेण्याबाबत**

**(४४) ३२२२८ (०५-०८-२०२१). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये कोरोना संसर्गाच्या काळात जे बी.ए.एम.एस. वैदयकीय डॉक्टर रुग्णसेवेत कार्यरत होते अश्या ८३५ डॉक्टरांना तसेच आरोग्य कर्मचारी (कोविड योध्दे) यांना कोरोना रुग्ण संख्या कमी झाल्यानंतर सेवेतून कार्यमुक्त करण्यात येत असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंत्राटी पध्दतीने नेमणूक झालेल्या डॉक्टरांना कार्यमुक्त करुन त्याठिकाणी एम.बी.बी.एस.अर्हताधारकांची नेमणूक करण्यात येत असुन कोरोना काळात राज्यात कर्मचारी अपुरे पडत असल्याने तात्पुरते कर्मचारी सेवेत घेण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात कोरोनाचा संसर्ग सुरु झाल्यापासून बी.ए.एम.एस. अर्हताधारक कंत्राटी वैदयकीय अधिका-यांनी अविरत रुग्णसेवा केली असुन देखिल अशा वैद्यकीय अधिका-यांना/डॉक्टरांना तसेच आरोग्य कर्मचारी यांना कार्यमुक्त करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, राज्यात विशेषत: ग्रामीण भागात एम.बी.बी.एस. डॉक्टरांची कमतरता सतत जाणवत असल्याने या बी.ए.एम.एस डॉक्टरांना कायमस्वरुपी सेवेत समाविष्ट करुन घेण्यात यावे अशी मागणी अनेक लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री, आरोग्यमंत्री यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(६) असल्यास, त्यानुसार कंत्राटी वैदयकीय अधिका-यांना व आरोग्य कर्मचारी यांना कायमस्वरुपी सेवेत सामावून घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (०२-१२-२०२१) :** (१) प्राथमिक आरोग्य केंद्राच्या ठिकाणी वैद्यकीय अधिकारी गट-अ संवर्गाची पदे रिक्त राहू नयेत याकरीता सदर पदे कंत्राटी एमबीबीएस अर्हताधारकांमधून प्राधान्याने भरण्यात यावीत तसेच त्यानंतरही सदर पदे रिक्त राहत असल्यास ती पदे नियमित अथवा कंत्राटी एमबीबीएस अर्हताधारक वैद्यकीय अधिकारी मिळेपर्यंत बी.ए.एम.एस. अर्हताधारकांमधून कंत्राटी पध्दतीने भरण्याबाबत असलेल्या निर्देशानुसार सदर पदांवर कंत्राटी पध्दतीने बीएएमएस वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत.

तसेच सदर पदांवर बंधपत्रित एमबीबीएस अर्हताधारक उमेदवार उपलब्ध होत असून त्यांना पदस्थापना देणे आवश्यक असल्याने कंत्राटी बीएएमएस वैद्यकीय अधिकारी यांना कार्यमुक्त करण्यात येत आहे. तथापि, कोविड-१९ साठी राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत मंजूर पदांच्या अधीन राहून आवश्यकतेनुसार त्यांच्या सेवा घेण्याचा विचार करण्यात यावा असे आयुक्तालयाचे दि. ०६.०५.२०२१ च्या पत्रान्वये सर्व जिल्हाधिकारी यांना कळविण्यात आलेले आहे.

(२) व (३) हे अंशत: खरे आहे.
संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन मुंबई यांचे पत्र क्र संवैशिवसं/ एमबीबीएस/ बंधपत्रसेवा/ कार्यवाही/८अ, दि. १३.११.२०२० नुसार बंधपत्रित उमेदवारांना ऑनलाईन पध्दतीने बंधपत्रित सेवा उपलब्ध करुन देण्याबाबत सुचीत केलेले आहे. तसेच त्यांचे पत्र दि. ११.०४.२०२१ अन्वये एकुण २५११ बंधपत्रित उमेदवारांची यादी संचालनालयास प्राप्त झाली असून सदर उमेदवारांना बंधपत्रित सेवेकरीता उपसंचालक कार्यालयाकडे वर्ग करण्यात आलेले आहे. बंधपत्रित एमबीबीएस अर्हताधारक उमेदवार उपलब्ध होत असून त्यांना पदस्थापना देणे आवश्यक असल्याने कंत्राटी बीएएमएस वैद्यकीय अधिकारी यांना कार्यमुक्त करण्यात येत आहे.
(४) हे खरे आहे.
(५) व (६) नियमित वैद्यकीय अधिकारी व आरोग्य कर्मचारी यांची पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येत असल्याने कंत्राटी अधिकारी/कर्मचारी यांना कायमस्वरुपी सामावून घेण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**चिखली (जि बुलढाणा) येथे ट्रामा केअर सेंटर सुरू करण्याबाबत**

**(४५) ३२२४० (११-०८-२०२१). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिखली (जि.बुलढाणा) हा तालुका बुलढाणा जिल्ह्याचा मध्यवर्ती तालुका असून येथून राष्ट्रीय व राज्य महामार्ग जात असल्यामुळे येथे अपघातांचे प्रमाण जास्त असल्याने चिखली येथे कोणत्याही वैद्यकीय सुविधा नसल्याने अपघातग्रस्तांना प्राथमिक उपचारासाठी बुलढाणा येथे जावे लागते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चिखली येथील उपजिल्हा रुग्णालयात ट्रामा केअर सेंटर सुरू करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हा शल्य चिकित्सक, बुलढाणा यांच्याकडे दिनांक २१ जुलै, २०२० रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने चिखली येथील उपजिल्हा रुग्णालयात ट्रॉमा केअर सेंटर सुरु करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (१०-१२-२०२१) :** (१) नाही,हे खरे नाही.
ग्रामीण रुग्णालय, चिखली येथे प्रथमोपचार तसेच तात्काळ आवश्यक उपचार देण्यात येतात.तसेच आवश्यक असल्यास रुग्णांना जिल्हा सामान्य रुग्णालय,बुलढाणा येथे संदर्भित करण्यात येते.
(२) हे अंशत: खरे आहे.
स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २१ नोव्हेंबर, २०२० च्या पत्रान्वये जिल्हा शल्यचिकित्सक, बुलढाणा यांच्याकडे मागणी केली आहे.

(३) ग्रामीण रुग्णालय, चिखली येथे ट्रॉमा केअर युनिट स्थापन करण्याचा प्रस्ताव शासनास अद्याप अप्राप्त आहे.सदर प्रस्ताव प्राप्त झाल्यास शासन निर्णय दि.१८ सप्टेंबर, २०२० च्या निकषानुसार पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**तळेगाव दाभाडे (ता.मावळ, जि.पुणे) येथील मायमार संचलित डॉ.भाऊसाहेब सरदेसाई ग्रामीण रुग्णालयाने मृतदेह देण्यास नकार दिल्याबाबत**

**(४६) ३२३७० (०५-०८-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे अनेक रुग्णांवर खाजगी रुग्णालयामध्ये औषधोपचार करावे लागत असून या रुग्णांकडून शासनाच्या दर नियंत्रण पत्रकातील तरतुदीना डावलून अवास्तव बिल आकारले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तळेगाव दाभाडे (ता.मावळ, जि.पुणे)येथील मायमार संचलित डॉ.भाऊसाहेब सरदेसाई ग्रामीण रुग्णालयात उपचारादरम्यान श्री.गणेश लोके या रुग्णाचा वैद्यकीय बिल न दिल्याने मृतदेह देण्यास नकार दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, रुग्णालयाचे बिल भरले नाही म्हणून मृत्यूमुखी झालेल्या श्री.गणेश लोके या रुग्णाचा मृतदेह तीन दिवस शवागारात ('कोल्ड स्टोरेज') मध्ये ठेवल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यदरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कोरोना रुग्णांकडून शासन निर्णयानुसार बिल आकारण्याबाबत व बिलासाठी मृतदेह अडविणाऱ्या तळेगाव दाभाडे येथील मायमार संचलित डॉ.भाऊसाहेब सरदेसाई ग्रामीण रुग्णालयांच्या व्यवस्थापनाची चौकशी करून त्याच्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे

**श्री. राजेश टोपे (१३-१२-२०२१) :** (१) होय हे अंशतः खरे आहे,

कोरोनाग्रस्त रुग्णांकडून अथवा इतर आजाराच्या रुग्णांकडून अधिक बिल आकारल्याच्या / उपचारास नकार दिल्याच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. याबाबत राज्य स्तरावरील सनियंत्रण मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी यांच्याकडून करण्यात येत असून जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी व महानगरपालिका क्षेत्रामध्ये महानगरपालिका आयुक्त यांच्याकडून सनियंत्रण केले जात आहे.
(२) हे खरे नाही.
(३) होय हे अंशतः खरे आहे,

गणेश लोके यांचा मृतदेह तीन दिवस शवागारात ठेवला होता हे खरे आहे, परंतू बिलाच्या वसुलीसाठी ठेवल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(४) प्रस्तुत प्रकरणी मायमार संचलित डॉ. भाऊसाहेब सरदेसाई ग्रामीण रुग्णालयाच्या व्यवस्थापनाची चौकशीसाठी विभागीय आयुक्त, पुणे विभाग यांचेकडील दिनांक १३.०५.२०२१ च्या आदेशान्वये चौकशी समिती नेमण्यात आलेली होती. चौकशी अहवालानुसार रुग्णाचे मुलाने सादर केलेल्या कागदपत्रावरुन रु.१०,०००/- चे ॲडव्हान्स भरलेले असून महात्मा ज्यातिबा फुले जन आरोग्य योजनेतंर्गत रुग्ण पात्र झालेले असलेचे नमूद केलेले आहे. तसेच सदर प्रकरणाच्या चौकशीअंती प्राप्त तक्रारीमध्ये तथ्य नसल्याबाबत आढळून आलेले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेडची मान्यता नसताना कंपनी सेक्रेटरी व विधी अधिकारी यांची नियमबाह्यरित्या कंत्राटी पद्धतीने नेमणूक केल्याबाबत**

**(४७) ३२३७२ (११-०८-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेडच्या (पीएमपीएमएल) सन २०१७ च्या आस्थापना आराखड्यातील कंपनी सेक्रेटरी व विधी अधिकारी (C.S & L.O) या पदांना स्थगिती देण्यात आली असताना तसेच मान्यता नसतानाही सदर पदांवर कंत्राटी पद्धतीने नेमणुका करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंत्राटी पदावरील नेमणुकांची कालमर्यादा संपल्यावर शासन निर्णयाविरुध्द मुदतवाढ देण्यात येऊन व संचालकांच्या बैठकीत मान्यता न घेता कंत्राटी पद्धतीने श्रीमती भरमकर यांची पीएमपीएमएलच्या कंपनी सेक्रेटरी व विधी अधिकारी या पदांवर पुन्हा नेमणूक करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शासन निर्णयांच्या नियम व अटींचे उल्लंघन करुन नियमबाह्यरित्या करण्यात आलेल्या नियुक्तीबाबत संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-१२-२०२१) :** (१) व (२)

सन २०१७ मध्ये पुणे महानगर परिवहन महामंडळामार्फत नव्याने आस्थापना आराखडा संचालक मंडळाच्या मान्यतेने तयार करण्यात आला आहे. त्यास मा.औद्योगिक न्यायालयाने स्थगिती दिली होती, हे खरे आहे.

तथापि, कंपनी सेक्रेटरी या पदाकरिता विशेष शैक्षणिक अर्हता व गुणवत्ता असणे आवश्यक आहे. श्रीमती निती भरमकर यांचेकडे कंपनी सेक्रेटरी व विधि अधिकारी या दोन्ही पदांची शैक्षणिक अर्हता व गुणवत्ता असल्याने, तसेच त्यांना या पदाच्या कामकाजाचा अनुभव असल्याने तात्पुरत्या स्वरूपात करार पध्दतीने व संचालक मंडळाच्या मान्यतेने सदर पदावर त्यांना नेमणूका देण्यात आल्या आहेत, हे खरे आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड (PMPML) च्या वतीने स्वताच्या मालकीच्या बसेस ऐवजी ठेकेदारांच्या बसेस चालवल्याने परिवहन महामंडळाच्या झालेले आर्थिक नुकसान

**(४८) ३२३७३ (११-०८-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेडच्या (पीएमपीएमएल) माहे मार्च, २०२० मधील लॉकडाऊन काळात तत्कालीन सीएमडी यांनी पीएमपीच्या मालकीच्या बसेस प्रथम संचलनास वापरण्याचे धोरण निश्चित केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कालावधीत पीएमपीएमएल मालकीच्या बसेस पूर्ण क्षमतेने न चालवता सुमारे १५०० बसेस पैकी ६०० बसेस बंद ठेवून ठेकेदारांच्या ६०० ते ६५० बसेस चालविलन्यात आल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ठेकेदारांच्या हितासाठी पीएमपीएमएलच्या बसेस बंद ठेवून ठेकेदारांच्या बसेस चालविल्याने महामंडळास दरमहा रुपये १५ कोटींचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोरोनामुळे पीएमपीएमएलची आर्थिक परिस्थिती बिकट असताना करारातील नमूद अटी शर्तीचे पालन न करता ठेकेदारांच्या बसेस चालवून पीएमपीएमएलचे आर्थिक नुकसान करणाऱ्यां अधिकाऱ्यांची चौकशी करुन त्यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-१२-२०२१) :** (१), (२) व (३) लॉकडॉऊन कालावधीत मार्च, २०२० ते सप्टेंबर, २०२० मध्ये पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या ताफ्यातील स्वत:च्या मालकीच्या व खाजगी बस ठेकेदारांच्या बसेसचे संचलन पूर्णत: बंद करण्यात आले होते.

कोरोना विषाणूचा प्रादूर्भाव अंशत: आटोक्यात आल्यानंतर अनलॉक प्रक्रीयेमध्ये पहिल्या टप्प्यात महामंडळाकडून स्वत:च्या मालकीच्या एकूण ४८० बसेसचे अंशत: संचलन सुरू केले. दि.२५.१२.२०२० पासून महामंडळाच्या मालकीच्या ४८० व खाजगी बस ठेकेदारांच्या २५६ बसेसचे संचलन सुरू करण्यात आले.

अनलॉक मधील शासनाच्या धोरणानुसार दि.०२.०९.२०२० पासून बस ठेकेदाराच्या करारातील अटी व शर्तीनुसार आश्वासित किलोमिटरची पूर्तता करण्यासाठी बस ठेकेदारांच्या बसेसचे संचलन सुरू करणे आवश्यक होते. त्यानुसार पहिल्या टप्प्यात अंशत: बसेस सुरू केल्या.

ठेकेदारांच्या बस सुरू केल्या नसत्या तर नवीन सीएनजी बसेसेच्या करारातील अटीनुसार आश्वासित किलोमीटरची पूर्तता न झाल्यास ५० टक्के रक्कम बस ठेकेदारांना द्यावी लागली असती. त्यामुळे ठेकेदारांच्या बसेस चालविल्याने महामंडळास दरमहा रू.१५ कोटी रूपयांचे नुकसान झाले, असे म्हणता येणार नाही, असे पुणे महानगर परिवहन महामंडळाने कळविले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील अंधेरी (पूर्व) न. भू. क्र. ६७६, मौजे - अंधेरी या शासनाच्या भूखंडावर लावण्यात आलेले अनधिकृत स्टॉल्स निष्कासित करण्याबाबत

**(४९) ३२३८९ (०२-०९-२०२१). श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील अंधेरी (पूर्व) न. भू. क्र. ६७६, मौजे - अंधेरी या शासनाच्या भूखंडावर अनधिकृतरित्या ८ स्टॉल्स लावण्यात आलेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सर्व रेल्वे स्थानकापासून १५० मी. अंतरापर्यंत स्टेशन परिसरात पदपथ व रस्ते मोकळे ठेवण्याचे मा.सर्वोच्च न्यायालय व मा.उच्च न्यायालयाने आदेश दिले असतांनाही सदर स्टॉल्स अंधेरी रेल्वे स्थानकापासून ५० मी. अंतरामध्ये अनधिकृतरित्या लावण्यात आलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर जागा शासनाची असल्याकारणाने स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १९ एप्रिल, २०१७, २९ मार्च, २०१८ व १५ मार्च, २०२१ रोजी जिल्हाधिकारी व उपजिल्हाधिकारी यांना पत्रव्यवहार करून सदर अनधिकृत स्टॉल्स निष्कासित करण्याबाबत कळविले असून, गत ४ वर्षापासून पत्रव्यवहार करुनही कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर अनधिकृत स्टॉल्स निष्कासित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-१२-२०२१) :** (१) अंधेरी (पूर्व), न.भू.क्र. ६७६, मौजे अंधेरी या शासकीय मिळकतीवर अनधिकृत बांधकामाबाबतची/स्टॉलची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधींकडून उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) यांचेकडे प्राप्त झाली असल्याचे गृहनिर्माण विभागाने कळविले आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदर २९ स्टॉल्सपैकी काही स्टॉल्सधारकांनी मा. शहर दिवाणी न्यायालयात सूट क्र. ३१५३ ते ३१६१/२०१६ अन्वये दावे दाखल केले होते. त्यानुसार मा. न्यायालयाने दिनांक २८.०२.२०१७ रोजी ९ स्टॉल्सना सारंगी हॉटेलच्या समोर, वर्टेक्स विकास इमारतीजवळ, अंधेरी (पूर्व) या ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपात स्थलांतरीत करण्याचे आदेश दिले होते.

त्यानुसार पात्र ८ स्टॉल्स न.भू.क्र. ६७६ मौजे अंधेरी येथे तात्पुरते स्वरुपात स्थलांतरीत करण्यात आले आहेत.

(४) व (५) सदर स्टॉल्स सद्य:स्थितीत ज्याठिकाणी तात्पुरत्या स्वरुपात स्थलांतरीत करण्यात आले आहेत त्या रस्त्यास ६० फुटांची नियमित रेषा मंजूर झाली असून, सदर स्टॉल्स हे नियमित रेषेच्या आत आहेत.

सदर रस्त्याचे रुंदीकरण करतेवेळी या भूखंडातील आवश्यक जागेचे अधिग्रहण करुन सदर स्टॉल्स महापालिकेच्या धोरणानुसार स्थलांतरीत करण्यात येणार असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

---

**राज्यातील ३०० खाटांची रुग्णालये व त्याअंतर्गत संलग्नित शासकिय वैद्यकिय महाविद्यालये सुरू करून सार्वजनिक खाजगी भागीदारीवर खाजगी संस्थेस देण्याबाबत**

**(५०) ३२४०९ (११-०८-२०२१). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने वैद्यकिय महाविद्यालय स्थापन करण्याबाबत सुधारित नियमावली सन २०१५ मध्ये प्रसिध्द केली असून त्यानुसार राज्य शासनाने राज्यातील ३०० खाटांची रुग्णालये व त्याअंतर्गत संलग्नित शासकिय वैद्यकिय महाविद्यालये सुरू करून सार्वजनिक खाजगी भागीदारीवर खाजगी संस्थेस देण्याबाबत धोरण निश्चित करण्यासाठी दि. २४ जानेवारी २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये समिती गठीत केली आहे, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, सदरहु समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,

(३) असल्यास, सदरहू अहवालात करण्यात आलेल्या शिफारसींचे थोडक्यात स्वरूप काय आहे आणि तदनुषंगाने याबाबत शासनाने कोणते धोरण निश्चिती केले वा करण्यात येत आहे;

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (१०-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नाही, सदर समितीने आपला अहवाल अद्याप सादर केलेला नाही.

(३) आणि (४) प्रश्न उदभवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.